# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २०.०७.२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.०६) इतिवृत्त

बुधवार दिनांक २० जुलै २००५ रोजे स्थायी समितीची सभा मा.सभापती श्री.काशिनाथ कोकाटे यांचे अध्यक्षतेखाली ''मलिक अंबर स्थायी समिती सभागृह '' येथे सकाळी १.३० वाजता ''वंदे मातरम्'' या गिताने सुरू झाली. या सभेस मा.आयुक्त व अधिकारी वर्गासह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.

(०१) सौ. खंदारे वंदना प्रकाश
(०२) श्री. गवळी रविकान्त काशीनाथ
(०३) सौ. जधव संगिता विठ्ठलराव
(०४) सौ. दलाल लता श्रीनिवास
(०५) श्री. दाभाडे मिलींद यशवंत
(०६) श्री. दिलीप नारायण गायकवाड
(०७) श्री. नासेर नहदी मोहंमद याहीया नहदी
(०८) श्री. पांडे विनायक प्रभाकर
(०९) श्री. बारवाल गजनन रामकिशन
(१०) श्री. विसपुते शशांक दामोधर
(११) श्री. वैद्य रेणूकादास दत्तोपंत

**संवाद :**

मा.सभापती : रात्रीच्या अचानक झालेल्या मोठया पावसामुळे या शहरातील रहिवाश्याची तांरांबळ झालेली आहे अनेक भागात पाण्याचा मोठा प्रवाह होता मा.आयुक्त मा.महापौर उपआयुक्त तसेच मी स्वत: व संबधीत अधिकारी यांनी ठिकठिकाणी जवून पाहणी केलेली आहे मा.आयुक्त लवकरच येतील तसेच संबधीत कार्यकारी अभियंता हे सुध्दा बैठकीला येतील आजच्या बैठकीची वेळ ही ११.३० वाजता होती सभेला वेळ झालेला आहे आता बैठकीला सुरूवात होत आहे चर्चेला सुरूवात करावी.

श्री.रेणूकादास वैद्य : जकात विभागाच्या संदर्भात मला मुद्दे मांडवयाचे आहेत जकात विभागावर चर्चा करावी मागिल बैठकीत दोन पुस्तकाच्या बाबतीत माहिती सभागृहात दिलेली होती आज पून्हा दोन पुस्तकाची माहिती हाती आलेली आहे पुस्तकाचा क्रमांक आहे १३९९०१ ते १४०००० दुसरा क्र.१५४९०१ ते १५५००० मागच्या वेळेस मी जसे म्हटले त्याच प्रमाणे या ही पुस्तकाचे नाका कारकून यांनी कुठेतरी गोडावूनला जवून कुणाच्या तरी सांगण्यावरून काम केलेले आहे नाका कारकूण यात दोषी असण्याचे कारण नाही ते कुणाच्यातरी सांगण्यावरून काम करीत असतात परंतु तीन तासात ४० दुकानाचे ऑडीट केलेले आहे.सदर कर्मचारी हे जकात नाक्यावर दिवसभर काम करीत असतात त्यानंतर हे कर्मचारी ३ तासात ४० दुकानाचे ऑडीट करतात ते कशा पध्दतीन काम करीत असतात याची दखल प्रशासनाने घेतली पाहिजेऑडीट करीत आसतांना जे कुणी कर्मचारी होते त्याचेबरोबर कोणीही नव्हते अशी माझी माहिती आहे.एका कर्मचाऱ्यांनी हे काम

केलेले आहे ऑडीट करतांना ज्या पावतीवर नोंदी घेतल्या जतात त्या यात नाही फरकाचा कार्यकाळ या पावती मधे दिसून येत नाही.किंवा ज्या वस्तूसाठी जकात आकारण्यात आलेली आहेत त्याचा तपशिल यात दिलेला नाही.बील नंबर तसेच डागांची संख्या याचाही उल्लेख नाही.त्यामूळे या पावत्या सर्व बोगस आहेत त्या कुणाच्या सांगण्यावरून तयार केलेल्या आहेत.म्हणून मागिल दोन पुस्तकांचा तसेच या दोन पुस्तकांचा प्रशासनाने सविस्तर खुलासा करणे आवशक आहे.

श्री.विनायक पांडे : जकात विभागातील कर्मचारी हे अनेक दिवसापासून जकात विभागातच काम करतात त्यांची इतरत्र बदली झाली तरी ते १५ दिवसात किंवा महिनाभरामधे पुन्हा जकात विभागात बदली होवून येतात.किती कर्मचारी असे आहेत की जकात विभागात ते ७ ते ८ वर्षापासून काम करीत आहे.बदली संदर्भात प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे रोटेशन प्रमाणे कार्यवाही होणार आहे कि नाही खुलासा देण्यात यावा.

श्री.बारवाल गजनन : रात्रीच्या मोठया झालेल्या पावसामुळे ज्या ज्या घटना घडल्या त्या ठिकाणी रात्रीपाससून ते आतापर्यत आपण जी पाहणी केली व संबधीत अधिकाऱ्यांना सूचना दिल्या त्याबद्दल आपले अभिनंदन करतो. आताच स.सदस्य श्री रेणूकादास वैद्य यांनी पावती पुस्तकाच्या संदर्भात सुचना केली याची गंभीर दखल घेतली पाहिजेतसेच अनेक वर्षापासून जकात विभागात तेच ते कर्मचारी काम करीत आहे.याची दखल तात्काळ घेतली नाही तर भविष्यात अनेक बाबींना तोडं दयावे लागेल.मागील दोन पावती पुस्तकांचा तसेच आताच जे दोन पावती पुस्तकांच्या संदर्भात सुचना केलेली आहे त्याचा सविस्तर खुलासा करण्यात यावा .

श्री.दिलीप गायकवाड :सुराणा बिल्डर्स व सजन एजन्सीजकडून गेल्या ८ महिन्यापासून जकात वसूल केलेली आहे का? जकात वसूल केलेली नसेल तर कारण काय माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :आताच काही सदस्यांनी जकात पावती पुस्तकाच्या संदर्भात सूचना केलेली आहे ज्या काही नोंदी केलेल्या आहेत त्या नेहमीच्या प्रमाणे पावती वर दिसून येत नाही अशी त्यांनी सुचना केलेली आहे. चार पावत्याचे झेरॉक्स प्रती सभागृहात देण्यात येत आहे. या बाबतीत जकात अधिक्षक यांनी खुलासा करावा.

जकात अधिक्षक : पावती पूस्तक क्र ९२० व १३०१ च्या संदर्भात मी खुलासा सादर केलेला आहे.जी पुस्तके जकात नियम २४ मधे वर्षभरामधे त्या ट्रेडर्सने किती माल शहरामधे आणलेला आहे त्याची मागणी आपण नोटीसच्या माधयमातून करतो.आणि जकात नियम २ (२१)यानूसार त्याची तपासणी केली जते.त्यात असे लिहिलेले आहे की,जकात आकारल्या जणाऱ्या मालाचे मूल्य करण्यात आलेल्या मालाची मूळ किमंत अधिक उत्पादन शुल्क विमा शुल्क विक्री कर वेंन्डर फीस वाहन तळ खर्च व वाहन आकार आणि वाहतूक भाडे आयात नाक्यावर ज्या ठिकाणी माल येईपर्यत आयाताने केलेल्या इतर अनुषंगीक खर्च मिळून आलेल्या मालाचे मूल्य हा जे खर्च आहे ज्या वेळेस माल शहरामधे येतो त्यावेळेस डिलेवरी चलान मिळत नाही मएणून बाजर भावाप्रमाणे मुल्याकंन करून त्या मालाची जकात वसूल केली जते.इतर जे खर्च असतो ट्रांझीट फीस जी असते ती त्यामधे ॲड झालेली नसते आणि ती काही लाखाच्या मधे महापालिकेस मिळते.ॲनीवल नोटीस देवून तपासणी केली जते व त्यात जी तफावत निघते ती

रक्कम वसूल करतो आणि वर्षाभरामधे जी तफावत निघते त्याची पावती देण्यात येते.

श्री.बारवाल गजनन : स.सदस्य यांनी जे मूद्दा उपस्थित केलेला आहे तेवढाच खुलासा करावा इतर

मा.सभापती : मूळ प्रश्न असा की ज्या पावत्या फाडलेल्या आहेत व पावती बुकातील नंबर हे पावती मधे जे नमूद करावयास पाहिजे ते केलेले नाही असे मत व्यक्त केलेले आहे.

श्री.रेणुकादास वैद्य : बील नंबर, चालन नंबर, वस्तुंची संख्या, फरकात समाविष्ट केली नाही.

जकात अधिक्षक : वर्षभरात जे बिल तपासले जतात. सर्वच बिल एकाच पावतीवर टाकू शकत नाही. एल.आर., बील नंबर टाकलेला असतो.

श्री.रेणूकादास वैद्य : कोठून ते कूठपर्यतच्या कार्यकाळातील ते बील फाडण्यात आलेले आहे कार्यकाळ त्या बिलावर असणे आवशक असतांना तो यावर नमूद नाही.

मा.सभापती : अशा कार्यप्रणालीची सुरूवात केव्हा तरी पूर्वी पासून झालेली असेल किती पावत्या व किती रक्कमेच्या पावत्या होत्या त्या बाबतीत माहिती देता येईल का?नियमीत अशा पावत्या फाडल्या जतात का ?

जकात अधिक्षक :पावतीवर जे कार्यकाळ आहे तो नमूद करावयास पाहिजे निवडणूक असल्यामूळे जे लोक मिळावयास पाहिजे होते ते मिळाले नाही ऑर्डरमधे मी नमूद केलेले होते की जेवढया कार्यकाळाची तपासणी करणार आहोत तो कार्यकाळ पावतीवर नमूद करावयास पाहिजे

श्री.बारवाल गजनन : पावतीवर कार्यकाळ नमूद करावयास पाहिजे आताच अधिकारी यांनी उल्लेख केलेला आहे का नमूद केलेला नाही हाच प्रश्न स.सदस्यांचा आहे. कुणाचे हितसंबध आहे का कार्यकाळ नमूद केलेला नाही आणि अशीच कार्यवाही का होत आलेली आहे याचा खुलासा करावा.

जकात अधिक्षक : कुणाचेही हितसंबध नाही जे टारगेट ठरवून दिलेले असते मागिल वर्षी ७२ कोटीचे टारगेट होते स्थायी समितीने ७३ कोटीचे केले व सर्वसाधारण सभेने ७६ कोटीचे केलेले होते.प्रशासनाचे असेच मत असते की त्या टारगेट पर्यत वसूली होणे आवशक आहे.

श्री.गजनन बारवाल :आताच अधिकारी यांनी खूलासा केला की कार्यकाळ टाकणे आवशक आहे परंतू हे सर्व समोर असतांना का टाकलेला नाही याचा खुलासा द्यावा.

जकात अधिक्षक : टप्प्याटप्प्याने आपण पावत्या दिलेल्या आहेत यामधे काहीही अनियमितता झालेली नाही. आर्थिक नुकसान नाही.

श्री.रेणूकादास वैद्य : सर्व परीस्थिती समोर आणून दिल्यानंतरही अधिकारी सांगतात अनियमितता झालेली नाही झाली किंवा नाही हे अधिकारी यांनीच ठरवावे.

सौ.लता दलाल :टारगेट पूर्ण झाल्यानंतर बाकीच्यांना पावत्यादेण्याची गरज नाही आता निवडणूक आहे म्हणून सूट देण्यात आलेले आहे का असा काही प्रकार घडलेला आहे का.

श्री. गजनन बारवाल : कार्यप्रणाली सदोष असतांना अधिकाऱ्यानी यास वाव दिलेला आहे हे निदर्शनास आलेले आहे.

जकात अधिक्षक :सन २०००-०१ मधे ५३ कोटीचे टारगेट होते वसूली ही ४७.७६ कोटी झालेली होती. सन २००१-०२ मधेही अशीच परीस्थिती झालेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : जे प्रश्न विचारलेला आहे त्याचाच खुलासा करण्यात यावा.

जकात अधिक्षक :यामागचा उद्देश हाच आहे की जे उद्दिष्ट ठेवण्यात आलेले आहे त्याप्रमाणे वसूली करण्याचा प्रयत्न असतो.पावत्यामधे कोणतीही अनियमितता किंवा भ्रष्टाचार झालेला नाही.

श्री.रेणूकादास वैद्य :२०० पावत्याचे पुस्तक मी उपआयुक्त यांचेकडे दिलेले आहे त्यात अनियमितता झालेली आहे याची नोंट करून घेतलेली आहे.

जकात अधिक्षक :पावतीमधे फक्त कार्यकाळ टाकलेला नाही एवढीच अनियमितता आढळून येईल.

श्री.गजनन बारवाल :सार्वत्रिक निवडणूक होती म्हणून असा प्रकार कार्यवाही करण्यास सूरूवात केलेली होती काय?

जकात अधिक्षक : टप्याटप्याने पावती फाडण्याची परवानगी दयावी म्हणून एक पत्र मुख्य लेखापरीक्षक यांचेकडे दिलेले आहे.

मा.सभापती : जकात विभागाच्या दोन पुस्तकाच्या बाबतीत पावती च्या संदर्भात प्रकार समोर आलेले आहेत. जकात विभागाच्या कामकाजवर स.सदस्यांची चांगलीपकड आहे असे निदर्शनास आणून देवून सिध्द करून दाखविलेले आहे. असेच लक्ष कायम सदस्यांचे प्रशासनाच्या कामकाजवर राहीले तर टारगेट पूर्ण होण्यास मदत होईल असे वाटते.मागिल बैठकीतही दोन पावती बुकाचा उल्लेख झालेला होता त्या संदर्भात उपआयुक्त यांना चौकशी करण्याचे आदेशीत केलेले होते. आता आजच्या बैठकीत पुन्हा दोन पावती पुस्तकाच्या संदर्भात उल्लेख केला त्यात याचाही समावेश करावा जकात अधिक्षक यांना सुचना की हे चारही पावती बुक प्रशासनाकडे देत असतांना त्याची माहिती मला देण्यात यावी. अनेक मालाच्या बाबतीत पावतीवर तफावत आलेली असेल अनेक वर्षापासून अशा प्रकारे तपासणी होते.यापूर्वीही अशा काही पावत्या असतील तर त्याही निदर्शनास आणून दयाव्यात. या पावत्यामधे खाडाखोड होणार नाही यासाठी ती पावती पुस्तके उपआयुक्त प्रशासन यांचेकडे त्वरीत देणयात यावी.त्या बाबतीत मा.आयुक्त संपूर्ण चौकशी करून निर्णय घेतील.बदल्याच्या संदर्भात त्या त्या कर्मचाऱ्याचा मागिल अहवाल बघून बदल्या करण्यात याव्यात. तसेच सज्जन एजन्सी व सुराणा ट्रेडर्स यांचे मार्फत शहरामधे जे सुकामेवा येतो यातून किती जकात वसूल झालेली आहे या बाबतीतही कालपर्यंत म्हणजेच ८ महिन्याचा संपूर्ण अहवाल सादर करावा.

श्री.रेणूकादास वैद्य : पावसामूळे सर्वत्र परीस्थिती बेकार झालेली आहे यात प्रशासनाचा दोष आहे.दि१७ तारखेच्या दैनिक लोकमत वृत्तपत्रात रस्त्याच्या संदर्भात पानभर छापून आलेले आहे त्याबाबतीत प्रशासनाने खुलासा करावा. मान्सून पूर्व काम करावे म्हणून मी यापूर्वी तीन ते चार वेळा सूचना केलेली होती.

श्री.बारवाल गजनन : मागिल बैठकीत मी जकात विभागाच्या संदर्भात गाडयांचा प्रश्न उपस्थित केलेला होता सर्व गाड्यांचे रजिस्ट्रेशन झालेले आहे.याची माहिती प्रशासन आरटीओ विभागाकडून घेणार होते. त्याची माहिती आलेली आहे का खुलासा करावा.

श्री मिलिंद दाभाडे : मागिल बैठकीत मी जकात अधिक्षक यांना मेडिसिन कंपनीकडे जे रॉमटेरीयल येते त्यावर किती जकात वसूल केलेली आहे. माहिती विचारलेली होती अदयाप माहिती दिलेली नाही.

**श्री.दिलीप गायकवाड** : या शहरात किती इंटरप्रायजेस दुकाने आहेत आध्रंप्रदेश व इतर शहरातून किती शहरात आलेले आहे याची माहिती देण्यात यावी.

**जकात अधिक्षक** : प्रादेशिक परीवहन अधिकारी यांना क्र.८५२ दिनांक ३०.६.२००५ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे त्यात १ एप्रिल ते ३० जून २००५ पर्यत दोनचाकी व चारचाकी वाहनाचे किती रजिस्ट्रेशन झालेले आहे म्हणून माहिती विचारलेली आहे आपले कर्मचारी तेथे बसून आहे त्या विभागाची फीस असते ती भरल्यानंतर आपणांस रितसर माहिती मिळेल. माहिती प्राप्त झाल्यानंतर सभागृहासमोर ठेवली जईल.

**श्री.बारवाल गजनन** :आतापर्यत का फिस भरलेली नाही त्या विभागाचे पत्र आलेले आहे का यास उशीर लागणार असेल तर शहरातील इतर एजन्सीजआहे त्यांचेकडून माहिती का घेतलेली नाही.पत्रव्यवहार केला असेल त्या विभागाने डायरेक्ट पैसे भरण्याचे सांगण्यात आले आतापर्यत का भरणा केलेले नाही.

**जकात अधिक्षक** :त्या विभागाचे पत्र अदयाप प्राप्त नाही तेथील एका कर्मचारी यांनी सांगितले की पैसे भरावे लागतील. मी स्वत: तेथे गेलेलो होतो जकात निरीक्षक पाठविलेले होते.

**श्री.बारवाल गजनन** : त्या विभागाचे पत्र आलेले असेल तर ते दाखविण्यात यावे जकात अधिक्षक यांनी माहिती घेतलेलीच नाही घेतली असेल तर पत्र दाखवावे. शहरात जेवढे ॲटोमोबाईल्सची दुकाने आहे एजन्सी आहेत त्यांचेकडून माहिती घ्यावी किंवा आरटीओ कार्यालयाकडून घेण्यात यावी.

**मा.सभापती** : या संदर्भात जकात अधिक्षक यांनी शहरातील संबधीत एजन्सीज कडून तसेच आरटीओ कार्यालयाकडून माहिती घ्यावी जे काही फिस असेल ती भरणा करून आठ दिवसाच्या आत माहिती घेवून सभागृहासमोर सादर करावी.

**श्री.मिलिंद दाभाडे** : कालच्या पावसामूळे किती घरामधे पाणी गेलेले आहे किती ठिकाणी नुकसान झालेले आहे व अधिकारी यांनी कोणकोणात्या भागात पाहणी केलेली आहे याची माहिती देण्यात यावी तसेच औरंगपूरा येथील नाल्यावर बांधकाम परवानगी कशी व कोणत्या नियमाने देण्यात आलेली आहे याचाही खुलासा करण्यात यावा.

**श्री.बारवाल गजनन** : मा.आयुक्त तसेच मा.सभापती यांनी अनेक भागात पाहणी केलेली आहे त्या ठिकाणी महानगरपालिकेची यत्रंणा सज्ज होती का? नेहमीच अशा घटना पावसामूळे घडतात.

**श्री.शंशांक विसपूते** :पावसामूळे अनेक भागात नुकसान झालेले असून मागिल बैठकीत अतिकृमणाच्या बाबतीत मुद्या उपस्थित केलेला होता नाल्यावर अतिक्रमण करून आरक्षण क्र.२२९ नाल्याची दिशा बदलली असून पावसाचे पाणी गजनन कॉलनीमधे गेलेले आहे या संदर्भात संबधीतांवर कार्यवाही करणार होते ती केलेली आहे का ?

**सौ.लता दलाल** : सर्वच प्रकारच्या अतिक्रमणाच्या बाबतीत सभागृहात स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहे परंतु प्रशासनाकडून माहिती उपलब्ध होत नाही.अशा अतिक्रमणाच्या बाबतीत प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे कोणत्या विभागाकडून झालेली आहे याची माहिती देण्यात यावी. सभागृहात नुसती चर्चा होते त्याची दखल घेतली जत नाही याची गंभीर दखल घेण्यात यावी. मागिल प्रश्नाचा खुलासा करण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : या वर्षीचा पावसाळा उशीरा सुरू झालेला असून काल रात्री झालेल्या पावसामूळे नागरीकांना अनेक समस्यांना तोड दयावे लागलेले आहे आताच मी मा.सभापती यांचेबरोबर पाहणी केलेली आहे, बऱ्याच ठिकाणी अशी परीस्थिती आहे की २०-२० फुटाचे नाले हे आता ४-४ फुटापर्यत आलेले आहेत. नाल्याची नाली झालेली असून जेबांधकाम बाजूला झालेले आहे ते सर्व मोठमोठया बिल्डरांनी केलेले आहे असे वाटते. बऱ्याच ठिकाणी नाल्याचे पाण्याचा प्रवाह बंद केलेला दिसून येतो. ज्या बिल्डरांनी बांधकाम केलेले आहे त्यानंतर त्या त्या इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहेत का. तसेच बांधकाम परवानगी देतांना संबधीत विभागाने पाहणी केलेली होती का? खुलासा घेण्यात यावा.

श्री. नासेर नहदी : मी ज्या वार्डातून निवडून आलेलो आहे त्या भागातून खामनदी जते या नदीच्या बाजूच्या जगा पूर्वीचे त्यावार्डातील लोकप्रतिनिधी यांनी प्लॉटींग करून विक्री केल्या व त्या नदीच्या बाजूला आता मोठमोठी घरे झालेली आहे.आता सध्या परीस्थिती अशी आहे की नदीची नाली झालेली दिसून येईल. पाणी जण्यास जगा कमी राहिलेली आहे.रात्रीच्या पावसामूळे अनेक लोकांच्या घरामधे पाणी गेलेले आहे लोकांना मोठया प्रमाणात त्रास झालेला आहे पूढील विचार करून जे काम करावयास पाहिजेहोते ते करण्यात आलेले नाही. त्या नाल्याची साफसफाई सूध्दा केलेली नाही याबाबत चौकशी करण्यात यावी.

श्री.विनायक पांडे : बारापूल्ला गेट पासून ते हिमायतबाग पर्यत खामनदी आहे ती नदी राहिलेली नसून अतिक्रमणामूळे नाली झालेली आहे. स.नगर सेवक असेल माजे नगरसेवक असेल किंवा कोणी पुढारी असेल त्यांनी प्लॉट पाडून खामनदीकाठची जगा विकलेली असून अनेक बांधकामे झालेली आहेत.लोक तेथे आजच्या स्थितीला राहतात व हर्सूल तलाव पूर्ण भरल्यानंतर या नदीला पाण्याचा पूर येईल तेव्हा या नदीचे पूर्ण पात्र बदलून जणार आहे त्यावेळी जी परीस्थिती निर्माण होईल त्यास प्रशासन सुध्दा काही करू शकणार नाही अशी परीस्थिती निर्माण होईल. तसेच ज्ञानेश्वर विद्यालय आहे त्या बाजूलाच महापालिकेची शाळा असून या शाळेतील मूलांनाही धोका होवू शकतो. तरी झालेले अतिक्रमण हे त्वरीत काढावे.

श्री.मिलींद दाभाडे : बीएमसी बँक तसेच औरंगपुरा सुपर मार्केट हे नाल्यावर बांधकाम केल्यामूळे पाणी वाहत नसतांना सुपर मार्केटच्या बाजूलाच नाल्यावर बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे. ते काम त्वरीत थांबवावे जेणे करून भविष्यात जे धोका निर्माण होणार आहे तो होणार नाही.

श्री.दिलीप गायकवाड : या सभागृहात नुसती चर्चा होते कार्यवाही होत नाही मागिल बैठकीत अतिक्रमणाच्या बाबतीत चर्चा झालेली होती आपणास अतिक्रमण काढण्याचे आदेश देण्यात आलेले होते किती ठिकाणचे अतिक्रमण काढण्यात आलेले आहे तसेच नाल्यावरील अतिक्रमणे व उच्च न्यायालयाने जेअतिक्रमण काढण्याबाबत इमारती काढण्या बाबत आदेश केलेले आहे त्यानुसार कार्यवाही करण्यात यावी बायजीपूरा भागातील लहान प्रकारचे अतिक्रमण काढलेले आहे वृत्तपत्रात असे आलेले आहे की फार मोठे अतिक्रमण काढलेले आहे याबाबतीत कार्यवाही करण्यात यावी.

श्री.रविकांत गवळी :आताच आपण कसबेकर तेल भांडार येथे पाहणी केलेली आहे बरेचशे नुकसान झालेले आहे तसेच बाजूच्या नाल्यावर अनधिकृत बांधकाम चालू आहे ते कोणाचे

बांधकाम चालू आहे काहीही माहिती मिळाली नाही सदरचे बांधकाम त्वरीत थांबवावे .

सौ.लता दलाल : अतिक्रमणाच्या बाबतीत प्रशासनाने आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे तसेच स्थायी समिती ही प्रमुख समिती आहे व या समितीचे सदस्य म्हणून आम्ही प्रशासनास संपूर्ण माहिती विचारू शकतो तो आमचा अधिकार आहे जर त्याची पायमल्ली होत असेल तर योग्य नसून जे प्रश्न या सभागृहात विचारले जतात त्याची टोलवाटोलवीची उत्तरे न देता सत्य परीस्थिती काय आहेत ती समोर आली पाहिजेनुसती सभेत चर्चा होते मागिल बैठकीत जे प्रश्न उपस्थित केलेले होते त्याची थातुरमातूर उत्तरे देतात हे बरोबर नाही. जी माहिती विचारलेली होती ती सर्व माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : काल रात्रीच्या पावसामूळे लोकांच्या घरामधे पाणी गेलेले असून बऱ्याच नागरीकांना घराच्या बाहेर रात्रभर थांबवावे लागले. या शहरातील नाल्यावर होत असलेली अतिक्रमणे तसेच इतर अतिक्रमणे या बाबत स.सदस्य यांनी सूचना केलेल्या असून यापूर्वीही एक महिण्यापासून प्रत्येक बैठकीत याबाबतीत चर्चा होते व काही प्रमाणात कार्यवाही झाली असती तर रात्रीच्या पावसाने जनतेला जे त्रास सहन करावा लागला तो झाला नसता हे निश्चित आहे. रात्री दोन वाजेपासून नाल्याचे पाणी हे रस्त्यावर अनेक भागात लोकांच्या घरामधे गेलेले असून त्या त्या ठिकाणी अग्निशमन दलाची गाडी बोलवून कार्यवाही करण्यात आलेली आहे त्या संदर्भात संबधीत अधिकारी माहिती देतिलच तसेच खामनदी व इतर शहरातील जे नाले वाहतात त्यांची महसूल विभागाकडून काही माहिती प्राप्त झालेली आहे का, जर आलेली असेल तर खामनदी ही शहर अस्तीत्वात असल्यापासून त्या खामनदीचे पुर्वीचे क्षेत्रफळ किती होते ते सर्व त्यामधे असेल आताच काही सदस्यांनी म्हटले की अनेक घरे नाल्याच्या बाजूला झालेली आहे त्यामूळे अनेक लोकांना त्यांचा त्रास ही होत आहे.तसेच सिडको भागाकडून पोलीस कॉलनी, कटकटगेट कडून मोठे दोन नाले येतात या नाल्याच्या बाबतीत सुध्दा तीच परीस्थिती आहे.तसेच एमजीएम, रोकडीया हनुमान कॉलनीकडून येणारा नाला व विष्णूनगर भागातून वाहणारा नाल्याचीही हीच परीस्थिती आहे.ज्योतीनगर प्रतापनगर भागातून वाहणाऱ्या नाल्याचीही हीच परीस्थिती आहे या नाल्यावर काही अनधिकृत बांधकामे झालेली आहेत तर काही बांधकामे ही नाला वळवून केलेली आहेत, त्यात परवानगी सुध्दा दिलेल्या आहेत. त्यामूळे आताच पाहणी केल्यानूसार असे दिसून आले की यामूळे मोठी समस्या निर्माण झालेल्या आहेत. असे सात ते आठ नाले माझया समोर आहे त्याची यादी माझ्याकडे आहे. या नाल्याची मी रात्रीपासून पाहणी करीत आहे जेशक्य झालेले तेवढी पाहणी केलेली आहे.या नाल्याचा सर्वे करण्याची गरजअसून या नाल्याची नोंद घेवून कार्यवाही करणे आवशक आहे व सभागृहाला माहिती दिली पाहिजे ज्या ज्या वेळी अतिक्रमण झालेले आहे ते का काढू शकलो नाही असा प्रश्न आहे ते वेळीच काढले असते तर जी काही परीस्थिती निर्माण झालेली आहे ती झाली नसती अग्निशमन अधिकारी यांनी रात्रीपासून किती ठिकाणचे कॉल अटेन्ड केलेले आहे माहिती दयावी. तसेच नाल्यावरील अतिक्रमाणाच्या बाबतीत मनपाआयुक्त खुलासा करतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्याचे आदेशीत करण्यात येईल.

मुख्य अग्निशमन अधि. : रात्री १०.३० पासून या विभागास कॉल येत होते.आणि सकाळी ६ ते ७ वाजेपर्यत कॉल अटेन्ड केलेले आहेत. जवळपास ४० ते ५० कॉल अटेन्ड केलेले आहेत. याकामासाठी चार टिम केलेल्या होत्या, कन्ट्रोल रूमला वरीष्ठ अधिकारी सुध्दा ठेवण्यात आलेले होते. तसेच चार ऑपरेटर ठेवलेले होते. चार टीम करून प्रत्येक टिमला एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी पाठविण्यात येत होते.उस्मानपूरा चौकीसमोर दोन मोटारसायकलस्वार मुलासह वाहून चालले होते चार लोकांना वाचविण्यात आले. एक रिक्षा चालक होता त्यांनाही वाचवले. तसेच एन-८ भागात एक घर पडलेले होते तेथे ७ ते ८ व्यक्तीना बाहेर काढण्यात आलेले आहे कटकटगेट भागात पाण्यात घरामधे ७ ते ८ लोक अडकलेले होते त्यांना बाहेर काढण्यात आलेले आहे श्रेयनगर भागातही दोन तीन व्यक्तींना घराबाहेर काढण्यात आलेले आहे तसेच भावसिंगपूरा भागातही काही प्रकार घडलेले आहे तेथील कॉल असे एकूण ४० ते ५० कॉल रात्रीपासून अटेन्ड केलेले आहेत. त्याच टिममधील कर्मचारी ठिकठिकाणी काम करीत आहेत तसेच ज्या ठिकाणी पाणी साचलेले आहे तेथील पाणी पंपीग करण्याचे काम चालू आहे.

मा.सभापती : या विभागाचे कर्मचारी जेकाम रात्रीपासून करीत आहे अत्यंत चांगल्या पध्दतीने ते काम करीत होते, मी स्वत: पाहणी केलेली आहे. टेलीफोन ऑपरेटर सह इतर सर्व कर्मचारी ज्या ज्या ठिकाणचे मेसेजयेतील तेथे जत होते. या विभागाने अत्यंत चांगले काम केलेले असल्यामूळे मुद्दामहून त्यांचेकडून आकडेवारी सहीत माहिती घेतलेली आहे. चांगले काम केल्याबद्दल या विभागाचे संबधित अधिकाऱ्यासह सर्वांचे अभिनंदन करतो. अतिक्रमणाच्या बाबतीत जे मुद्दे स.सदस्यांनी उपस्थित केलेले आहे व मा.आयुक्त यांनी जी आताच पाहणी केलेली आहे त्याबधदल प्रशासनाची भुमिका काय आहे याबद्दल मा.आयुक्त यांनी सभागृहाला माहिती द्यावी.

मा.आयुक्त : कालच्या पावसामुळे बऱ्याच भागात मी पाहणी केलेली आहे अनेक नाल्यामधे नाला हा कमी जस्त रूंदीचा दिसून येतो. संपूर्ण नाल्याचा सर्वे करण्याची आवशकता आहे असे वाटते.या संदर्भात दोन अभियंते मिळून टिम तयार करून संपूर्ण नाल्याचा भाग ते फिरतील व कोठे व कोणत्या भागात नाल्याच्या बाजूला अतिक्रमण झालेले आहे याची माहिती घेतील. जे पर्यत पूर्ण माहिती येणार नाही तोपर्यत या बाबतीत नियोजन करू शकणार नाही हे करण्यासाठी चार ते पाच दिवसात कार्यवाही करता येईल व या सर्वेमूळे या पण बाबी लक्षात येतील की नाल्याच्या बाजूला कुठे झाडे आहे कोठे घाण साचलेली आहे त्यामूळे पाणी थांबून राहते. पुन्हा चार ते पाच दिवसानंतर असाच मोठया स्वरूपाचा पाऊस आल्यानंतर हीच परीस्थिती निर्माण होवू नये म्हणून तातळीने काम हाती घेता येईल.सर्वे करतांना नाल्यात अतिक्रमण किती व परवानगी किती जगेपर्यत दिलेली आहे हेही दिसून येईल.जवळपास ७० ते ८० टक्के बांधकाम हे अनधिकृत झालेले आहे ५ ते ६ दिवसात अभ्यास करून याबाबतीत धोरण ठरवावे लागणार आहे. त्या नुसार कार्यवाही होईल.

सौ.लता दलाल : गेल्या दोन तीन बैठकीपूर्वी अतिक्रमणाच्या बाबतीत स.सदस्यांनी प्रश्न उपस्थित केलेला होता नाल्यावर अतिक्रमण केलेले आहे नाला वळवून बांधकाम केलेले आहे असे दोन तीन ठिकाणचे मूद्दे उपस्थित केलेले होते त्याची माहिती घेवून

सभागृहाला देणार होते.त्या ठिकाणी बांधकाम परवानगी दिलेली होती का दिलेली नसेल तर ते अतिक्रमण होते असे म्हणावे लागेल तर अतिक्रमण विभागाने का कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे याची माहिती देण्यात यावी.

मा.आयुक्त : सर्वे केल्यानंतरच हे सर्व माहिती हाती येईल नाल्याच्या लेन्थ नूसार कळेल की किती जगेपर्यत परवानगी दिलेली होती किती अतिक्रमण झालेले आहे. कर्मचारी ७ ते ८ दिवसात सर्वे करून घेतील तेंव्हाच माहिती मिळेल.

सौ.लता दलाल : आताच जे खुलासा केला तो रात्रीच्या पावसामूळे जे परीस्थिती निर्माण झालेली आहे त्याबाबतीत केलेला आहे परंतू मागिल दोन तीन बैठकीत जे मुद्दा उपस्थित केलेला होता की नाल्यावर ओपन स्पेस दाखविण्यात आलेले आहे काही नाल्याचा प्रवाह वळवण्यात आलेला असून बांधकाम केलेले आहे अशा बिल्डरांवर मधल्या काळात प्रशासनाने काय कार्यवाही केलेली आहे. हा विषय गंभीर पणे मांडलेला होता या महानगरपालिकेची कोणी फसवणूक करीत असेल व नुकसान करीत असेल तर ते प्रशासनाच्या नजरेस आणून देणे हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही ते गंभीरतेने घेतेलेले दिसत नाही.

मा.आयुक्त : जेकाही तीन चार बैठकीपूर्वी जेकाही ठराविक ठिकाणचे नांव सागण्यात आलेले होते त्या संबधीची माहिती संबधीत अधिकारी देतिल परंतू जे पर्यत सर्वे करणार नाही तो पर्यत किती अतिक्रमण झालेलेआहे हे कळणार नाही.आज रोजी १०० टक्के सर्वे करण्याची गरज आहे.त्यानंतर धोरण ठरावावे लागेल की या बाबत करायचे काय? अधिकृत करायचे की तोडणार आहोत माझया माहिती प्रमाणे अधिकृत तर करता येणार नाही. एक प्रकरण समोर आलेले होते की ओपन स्पेस मधे नाला दाखविण्यात आलेला होता. तेथे स्थळ पाहणी मी स्वत केलेली असून तो नाला डीपी रोडमधे नव्हता तर असे थोडे नाले आहेतकी ते डिपी रोडवर नाहीत ते डिपी रोडमधे नसेल तर रेकॉर्डवर येत नाही. याबाबतीत मी डायरेक्शन दिलेले आहे की जेवढे नाले आहेत त्याचे सर्वेक्षण करून ते डि.पी. प्लॅनमधे टाकावे यासाठी ३७ ची कार्यवाही करावी लागेल. यासाठी पैसे पण लागतील व मोजणी करून च कार्यवाही करावी लागेल. खर्च किती लागेल त्या बाबतीत मंजूरीसाठी या सभागृहासमोर येणारच आहे.

श्री.मिलिंद दाभाडे : ज्यांनी महानगरपालिकेची दिशाभूल केलेली आहे फसवणूक केलेली आहे त्याचेवर काय कार्यवाही करणार आहे याचा खुलासा देण्यात यावा.

मा.आयुक्त : नियमाप्रमाणे कार्यवाही करता येईल.

श्री.बारवाल गजनन : मा.आयुक्त यांनी केलेला खुलासा बरोबर आहे परंतू मागिल बैठकीत स.सदस्यांनी ठराविक ठिकाणच्या अतिक्रमणा बाबत प्रश्न उपस्थित केलेले होते त्या संबधी आतापर्यत काय कार्यवाही केली आहे, केलेली असेल तर माहिती दयावी, केलेली नसेल तर का केलेली नाही याचाही खुलासा करण्यात यावा.आताच मा.आयुक्त साहेबांनी सर्वे करणार आहोत म्हणून म्हटले आहे परंतू या संदर्भात मागिल काळात सर्वे सुध्दा शहा कन्स्लटन्सी यांनी संपूर्ण शहराचा सर्वे केलेला आहे आराखडा सुध्दा दिलेला आहे.त्यासाठी ५ लक्ष रक्कम अदा करण्यात आलेली होती. तसेच अतिक्रमण बाबतीत बोलावयाचे झाल्यास गेल्या

१० वर्षात अनेक नाल्यावर मोठमोठी अतिक्रमणे झालेली असून नालेचे नाली झालेली आहे.आताच माहिति दिली की या बाबतीत नियोज्न करावे लागेल परंतू सध्या तरी नियोज्न करण्यास वेळ नाही असे वाटते. काही नाल्याच्या जगेवर परवानगी दिलेली आहे त्या दिल्या जत नाही परंतु का व कुणी दिल्या माहिति नाही.परवानगी देतांना अटी शर्तीचे पालन झालेले आहे किंवा नाही याची सुध्दा माहिती मागविण्यात आलेली होती ती दिलेली नाही औषधी भवनचा नाला श्रीमान श्रीमती दुकान खालील नाल्याची किमान २० ते २५ वर्षापासून त्या इमारतीखाली साफसफाई झालेली दिसून येत नाही. अशा ठिकाणी कर्मचारी काम करू शकत नाही अशी गंभीर परस्थिती निर्माण झालेली आहे. आताच मा.आयुक्तांनी या बाबत धोरण ठरवावे लागेल म्हणून म्टलेले आहे निश्चित तसा प्रस्ताव सादर करावा निर्णय घेतला जईल.

मा. आयुक्त : नाल्याचे सर्वेक्षण करावे लागेल त्यानंतर किती ठिकाणी किती फूट अतिक्रमण झालेले आहे हे कळेल.

श्री. गजनन बारवाल : माझ्या माहिती प्रमाणे केद्र शासनाकडून मागच्या वेळेस अनूदान प्राप्त झालेले होते व नाला ट्रेनिंगचे काम हाती घेण्यात आलेले होते ३ कोटी रूपये प्राप्त झालेले होते जेकाम यातून संरक्षित भिंतीचे केलेले आहे त्या भिंती आज्ही काही ठिकाणी दिसून येतील याचा अर्थ ती हद्य शेवटची असेल.त्यामूळे मूळ नाला कोठून वाहत येतो त्या नाल्याची कोठे रूंदी किती आहे हे सर्व माहित आहेत.जी परीस्थिती निर्माण झालेली आहे ती होईल म्हणूनच प्रश्न काही सदस्यांनी उपस्थिती केलेले होते. सर्व माहिती प्रशासनासमोर स.सदस्यांनी नज्रेस आणून देवूनही दखल घेतलेली नाही.

श्री.दिलीप गायकवाड : औरंगपूरा येथील नाल्यावर जेबांधकाम चालू आहे त्यास परवानगी दिलेली आहे का माहिती देण्यात यावी.

मा.सभापती :आताच मा.आयुक्त यांनी सविस्तर खूलासा केलेला आहे. शहरातील नाले व नदी या बाबतीत संपूर्ण अहवाल ८ दिवसात टिम तयार करून सभागृहात सादर करावा किती ठिकाणी परवानगी दिलेली आहे किती ठिकाणी अतिक्रमण झालेले आहे किती नाल्याचा प्रवाह वळविण्यात आलेला आहे याची संपूर्ण माहिती देण्यात यावी तसेच यासाठी काय नियोज्न करावयाचे याबाबतीत निर्णय घेतला जईल. त्या नंतर आवशकता पडल्यास सर्वसाधारण सभेत ठेवून योग्य तो निर्णय घेतला जईल.

श्री.रेणूकादास वैद्य : माझ्या वार्डात ही नाले आहेत त्या ठिकाणी मा.आयुक्तांनी भेट दिलेली नाही चार इमारती अशा आहेत की त्यामधे पाणी साचलेले आहे.

मा.आयुक्त : शक्य होईल तितक्या ठिकाणी स्थळ पाहणी केलेली आहे उर्वरीत ठिकाणीही पाहणी करण्यात येईल.

मा.सभापती :मा.आयुक्त यांना मा.महापौर यांनी बोलविलेले आहे अर्थसंकल्पाच्या संदर्भात चर्चा करणार आहे त्यांना जण्यास परवानगी देण्यात येते.

श्री रेणूकादास वैद्य : दिनांक १७ तारखेच्या वृत्तपत्रात शहरातील रस्त्याच्या संदर्भात तज्ञ डॉक्टराच्या तसेच नागरीकाच्या प्रतिक्रिया आलेल्या आहेत मान्सून पूर्व रस्त्याची कामे करावी म्हणून वारंवार अधिकाऱ्याना विनंती करण्यात आलेली होती. परंतू बज्ेट नाही सर्वसाधारण सभेची मान्यता नाही असे कारण पूढे करून त्या कामाची टाळाटाळ

केलेली होती  रस्त्याच्या बाबतीत नेहमीच ही परीस्थिती निर्माण होते  तात्पूरती व्यवस्था  करण्याची गरजहोती परंतु त्याकडे लक्ष न देता कामे केलेली नाही आज रोजी नागरीकांना रस्त्याने जतांना त्रास होत आहे. अशा रस्त्याची मा.सभापती यांनी पाहणी करून काम करण्या बाबतच्या सूचना देण्यात याव्यात.रस्त्याच्या संदर्भात मी दिं १.७.२००५ रोजी अति.शहर अभियंता यांना लेखी स्वरूपात पत्र दिलेले होते की रस्त्याच्या कामाची मागिल तीन वर्षापासूनची माहिती देण्यात यावी परंतू अदयाप माहिती दिलेली नाही.दुसरा विषय असा की कर्मचाऱ्याच्या बदल्या करणार आहोत यात गंभीर प्रश्न असा की ऑपरेटर कर्मचारी आहेत ते वर्षानुवर्ष एकाच विभागात काम करतात अग्निशमन विभागात सुधदा ऑपरेटर कर्मचारी आहेत या कर्मचाऱ्याच्या एक दुसऱ्या विभागात बदल्या करण्यात याव्यात अशी विनंती आहे.कारण स.सदस्य श्री कुचे व स.सदस्य श्री अब्दुल रशिद खॉन मामू यांचे बरोबर अतिशय खालच्या स्तरातील भाषेत वर्तण केलेले आहे चुकीच्या पध्दतीने नगरसेवकांना वागणूक दिलेली आहे. दुरध्वनी न उचलणे, दुरध्वनी आल्यानंतर १५-२० मिनीटे तो तसाच ठेवणे, फोन कट करणे, अटेन्ड न करणे अशा असंख्य तक्रारी या कर्मचाऱ्याच्या बाबतीत आहेत एकाच विभागात काम जस्त दिवस केल्यास क्रियाशिलता कमी होते असे वाटते म्हणून त्याचे दुसऱ्या विभागात बदल्या करण्यात याव्यात.

श्री. गजनन बारवाल : संपूर्ण वार्डातील रस्त्याची आजची परीस्थिती काय आहे माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : संपूर्ण वार्डातील रस्त्याची माहिती आजच्या आजदेवू शकणार नाही.

सौ. लता दलाल : रस्त्याच्या बाबतीत रजिस्टर ठेवण्यात येते. तो रस्ता केव्हा केलेला आहे किती मटेरीयल वापरण्यात आलेले आहे सध्याची परीस्थिती काय आहे याची किमान तीन वर्षापूर्वी केलेल्या रस्त्याची माहिती घेण्यात यावी जेणे करून ज्यानी  काम केलेले आहे त्यांचेवर  कार्यवाही करता येईल.

श्री.रेणूकादास वैद्य : रस्त्याचे रजिस्टर ठेवणे आवशक आहे मागिल बैठकीत रस्त्याच्या संदर्भात चर्चा करण्यात आलेली होती एका रस्त्यासाठी ७३ लक्ष खर्च होणार का असा प्रश्न केला असता त्या रस्त्यावर गेल्या १० वर्षापासून कामच केलेले नाही असे अधिकारी यांनी उत्तर दिलेले होते परंतु माझ्या माहिती नुसार १९९९ मधे डी अजीतसिंग यांनी त्या रस्त्याचे काम केलेले आहे त्यांना बील सुध्दा मिळालेले आहे. दोन्हीपैकी एक बाब स्पष्ट करावी.

अति.शहर अभियंता : उदा. २००५-०६ या वर्षात किती रस्त्याची कामे केलेली आहे याचे रजिस्टर मेन्टन केलेले असते. १९९९ मध्ये कोकणवाडी ते रेल्वेस्टेशन रस्त्याचे कोणी काम केलेले आहे, याची माहिती घेता येईल.

सौ. लता दलाल : जे ठेकेदार चांगले काम करीत नसतील तर त्यांना काळया यादीत समावेश करण्याचा अधिकार या सभागृहाला आहे. अशी कार्यवाही केली तर निश्चितपणे कामात सुधारणा होईल असे वाटते.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी या संदर्भात माहिती द्यावी. अतिरिक्त शहर अभियंता यांनी पद स्विकारण्यापुर्वी काम झालेले असेल.

शहर अभियंता : १९९९ मधे या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम केलेले आहे. संबधित अधिकारी यांना या संदर्भात माहिती नाही.

श्री रेणूकादास वैद्य : अधिकाऱ्यांना माहिती नसतांना चूकीची माहिती देतात हे बरोबर नाही मला माहित नाही असे उत्तर देणे त्यांनी अपेक्षीत होते. परंतू अति.शहर अभियंता यांनी त्या रस्त्यावर १० वर्षात कामच केलेले नाही असे उत्तर दिलेले आहे.

सौ. लता दलाल : ज्यानी ज्या पदाचा पदभार घेतला त्यांचेकडे मागिल माहिती असणे आवशकच आहे मा.आयुक्तांनी पदभार घेतलेला आहे त्यांनी असे म्हटले तर कितपत योग्य ठरेल .कारण रेकॉर्ड हे व्यक्तीचे नसून केलेल्या कामाचे असते. अधिकारी बदलून गेले तरी रेकॉर्ड हे कायम असते.माहिती नसेल तर यापूढे निश्चित ती माहिती ठेवावी. कारण जे चुकीची कामे झालेली आहे ती यापूढे होणार नाही व जनतेला जे त्रास होतो आहे तो होणार नाही.

शहर अभियंता :रोड रजिस्टर असणे आवशक आहे त्यात रस्ता केव्हा झालेला आहे त्या रस्त्यावर दुरूस्तीचे काम केव्हा केलेले आहे असे रजिस्टर पूर्वीपासूनच महानगरपालिकेमधे मेन्टन केलेले नाही.परंतु दरवर्षी काय काय कामे केलेली आहे त्या बाबतीतले रजिस्टर आहे.रोड रजिस्टर असणे आवशक आहे जेणे करून माहिती मिळण्यास सोपे जईल यापूढे रोड रजिस्टर तसेच बिल्डींग रजिस्टर अदयावत केले जईल. जेणे करून कोणत्याही अधिकाऱ्याना भविष्यात त्रास होणार नाही.

श्री. गजनन बारवाल : सर्व वस्तूस्थिती समोर आलेली आहे मागिल अनेक बैठकीत स.सदस्यांनी या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेले आहे १७ जूलैच्या वृत्तपत्रात शहरातील नागरीकांनी त्यांचे प्रतिक्रिया व्यक्त केलेल्या आहेत. बाहेर नागरीक महानगरपालिकेच्या कारभाराविषयी काय बोलतात हे निदर्शनास आणून देत आहे.त्यात असे म्हटले आहे की महापालिकेचे लक्ष आहेत का अशी टिका केलेली आहे. त्याच प्रमाणे हे शहर खड्ड्याचे शहर आहे अशा प्रकारच्या हेडींग आहेत. कोटयावधी रूपये जतात तरी कोठे महानगरपालिकेचे आत्मपरीक्षण करावे अशा प्रकारेचे वाक्य दिलेले आहे. जनतेनी ही माहिती दिलेली आहे त्यांचा आदर ठेवला पाहिजेव त्या प्रमाणे काम केले पाहिजेअसे माझे मत आहे. शहरात जेवढे रस्ते तयार केलेले आहे त्या सर्व रस्त्याची पाहणी केली तर सर्व रस्ते निष्कृष्ट दर्जचे दिसून येईल या संपूर्ण रस्त्याची गुणवत्ता पाहणी करून चौकशी करण्यात यावी.

अति.शहर अभियंता : स.सदस्य श्री वैद्य यांनी पत्र देवून ३ ते ४ वर्षाची माहिती मागविलेली होती माहिती संकलण करण्याचे काम चालू आहे कर्मचारी वर्ग कमी असल्यामूळे माहिती देवू शकलो नाही दोन ते चार दिवसात माहिती देण्यात येईल.दुसरा मुद्दा असा की पावसाळया पूर्वी काही कामे करावयाची होती मी स्वतः त्या ठिकाणची पाहणीही केलेली आहे त्या संबधीचे अंदाजपत्रकही तयार करून मंजूरीसाठी पाठविण्यात आलेले होते परंतू जे पर्यंत बजेटचे हेड पडत नाही तो पर्यत ती कामे करता येत नाही आजही ते काम झालेले नाही. मागिल वर्षी जेरस्ते केलेले आहे त्या रस्त्याची पाहणी करण्याचे आयोजन करावे. असे स.सदस्यांनी सूचना केली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : काही अधिकारी तसेच काही स.सदस्यांची एक समिती नियुक्त करून मागिल तीन वर्षात जेरस्ते करण्यात आलेले आहे त्याची पाहणी करण्यात यावी आजत्या रस्त्याची स्थिती काय आहेत व ज्यांनी ते काम केलेले असेल तो रस्ता खराब

झालेला असेल त्या ठेकेदाराला काळया यादीत समावेश करून भविष्यात त्यांना कामे न देण्याची कार्यवाही करावी एक चौकशी समिती नियुक्त करण्यात यावी.

श्री. गजनन बारवाल : रेल्वेस्टेशन कडे जणाऱ्या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले असून उड्डान पूलाजवळच बाजूला मोठमोठे खड्डे पडलेले आहे पाणी जण्यास रस्ता नाही याकडे प्रशासनाचे लक्ष आहे का? याची गंभीर दखल घेण्यात यावी तसेच पदमपूरा भागात हनूमान मंदीरा शेजरी उदयसिंग परदेशी यांचे घरात पाणी साचलेले आहे अनेक घराच्या भिंती पडलेलेल्या असून पाणी जण्यासाठी जगा नाही नाली झालेली आहे. ही वस्तूस्थिती सत्य असून याची गंभीर दखल घेण्यात यावी.

अति.शहर अभियंता :रेल्वेस्टेशनच्या रस्त्याच्या बाबतीत मुद्या उपस्थित केलेला आहे तो रस्ता दोन ते चार महिण्यात होणारच आहे.

मा.सभापती : पदमपूरा हनूमान मंदीर ते रेल्वेस्टेशन रस्त्याच्या संदर्भात मुद्या उपस्थित केलेला आहे. माझ्या मते या रस्त्याचे काम महापालिका करीत नाही एमएसआरडीसी मार्फत होते. चुकीची माहिती देण्यात येवू नये.पाण्याचा जे निचरा आहे तो काढण्याचे काम त्या विभागामार्फत होते बाबा पेट्रोल पंप ते रेल्वेस्टेशन पर्यतच्या रस्त्याचे पुन्हा पुन्हा जे डांबरीकरण करावे लागते तेथे काळया मातीमूळे रस्त्यावर खड्डे पडतात ते काम रस्ते विकास महामंडळ यांनी करावयाचे आहे.त्यासाठी त्या विभागास आजच्या आजपत्र देवून कार्यवाही करण्याचे दृष्टीने प्रयत्न करावेत.

श्री. गजनन बारवाल : कोकणवाडीकडून येणारा नाला हा रूंद असून पुलाखाली जेपाईप टाकलेले आहे ते संध्या बंद आहेत पाणी जत नाही. हे काम करीत असतांना पुढे काम करावेच लागणार आहे.

मा.सभापती : एमएसआरडीसी विभाग ज्या वेळेस काम करील त्यामधे पुलाचे सूध्दा काम केलेले पाहिजे त्या पाईपमधील घाण काढली पाहिजे पाणी वाहून जईल अशी व्यवस्था केली पाहिजे

अति.शहर अभियंता : त्या रस्त्यावर दोन ब्रिजकेलेले आहेत.

श्री गजनन बारवाल : काम केलेले होते परंतू आजरोजे तेथून पाणी वाहत नाही रात्री अनेक लोकांच्या घरात पाणी गेलेले होते तसेच अनेक लोकांच्या घराच्या भिंती पडलेल्या असून माझ्या अनेक नातेवाईकांच्या घरात पाणी गेलेले आहे आपण प्रत्यक्ष पाहणी करावी तेथील परीस्थिती दिसून येईल.

श्री.रेणूकादास वैद्य : अनेक लोकांच्या घरात पाणी गेलेले आहे ते पाणी साचलेले असून त्या बाबतीत कशा प्रकारे कार्यवाही करता येईल यासाठी सुचित करावे.

मा.सभापती : रस्त्याच्या कामाच्या संदर्भात स.सदस्यांनी केलेल्या सुचना व अधिकारी यांनी केलेला खुलासा या संदर्भात एक धोरण म्हणून सार्वजनिक बांधकाम विभागामधे जे रस्त्याची कामे तसेच इमारतीची कामे केली जतात त्या बाबतीत रेकॉर्ड ठेवण्याची पध्दत आपल्या मॅन्युअलमध्ये असावी. नोंद घेण्याची पध्दत नव्हती. एक कार्यकारी अभियंता ऐवजी चार कार्य.अभियंता झालेले आहे. कर्मचारी कमी आहे अशातला भाग नाही किमान १०कोटीच्या कामाचे बजेट एका कार्य.अभियंता यांचेकडे आहे. म्हणून काम केल्याचे रेकॉर्ड ठेवण्याची अडचण नसावी आजपर्यत रेकॉर्ड ठेवलेल नसले तरी आज पासून एक नियम म्हणून रेकॉर्ड ठेवण्यात यावे. अशी सूचना करण्यात येत आहे तसेच पावसाळयाचे दिवस असून तातडीने काही कामे करण्याची गरज पडते त्यासाठी बजेटची वाट पाहण्याची गरज नाही अशा

तातडीच्या कामासाठी ६७(३)(क) खाली कामे करता येतात. मा.आयुक्त मंजूरी देण्यास सक्षम आहेत परंतु कोणतेही काम थांबून ठेवता कामा नये गुंठेवारीच्या नावाखाली काम बंद केलेले आहे. गाड्या फसू लागल्या. काही भागात पावसामुळे रस्त्यांची दयनीय अवस्था आहे पाण्याचे टँकर बंद झालेले आहे रस्त्यावर मुरूम टाकता येत नाही असे कारण दाखविले जत आहे. परंतू पाण्याचे टँकर जण्यासाठी रस्ता करणे आवशक आहे तो खर्च करण्यात यावा काही अडचण आल्यास आमचीजबाबदारी राहील.

सौ.संगिता जधव : माझ्या वार्डात हनुमाननगर भागात ८ ते १० वर्षात १२०० घरे झालेली आहेत तेथे ड्रेनेजव पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही या भागात टॅकरद्वारे पाणी पूरवठा होतो या भागातील लोकांनी बेटरमेंन्ट चार्जेस भरलेले आहे वार्डात टँकर येण्यास रस्ता नाही चिखल झालेला आहे. तरी या रस्त्यावर मुरूम टाकण्यात यावा व इतर सोयी सूविधा करण्यात याव्यात.

मा.सभापती : या भागात रस्त्याचे काम करण्यासाठी गुंठेवारीचे कारण अधिकाऱ्यांनी दाखवू नये अशा भागात काम करण्यासाठी दोन कोटीची तरतूद केलेली असून आवशकता वाटत असेल तर तसा प्रस्ताव या सभागृहासमोर सादर करावा त्यास मंजूरी दिली जईल. कोणतीही अडचण येणार नाही आम्ही जबाबदार राहू.

सा.लता दलाल : कालच्या पावसामूळे अनेक भागातील नाल्याच्या कडेला असलेल्या संरक्षित भिंती पडलेल्या आहे काही ठिकाणी वाहून गेलेल्या आहे माझ्या वार्डात कोणीही पाहणी केलेली नाही पूढील काळात अशाच प्रकारचा मोठा पाऊस झाल्यास ज्या संरक्षित भिंती आहे त्या पडतील व मोठया प्रमाणात हाणी होवू शकते काही ठिकाणचे पूल वाहून गेलेले आहे त्यामूळे मनुष्यहाणी होवू शकते मागे एकदा सायली नावाची मूलगी नाल्यात पडून वाहून गेली होती तिचा मृत्यू झालेला होता सदर प्रकरण मोठया प्रमाणात सभागृहात चर्चा झालेली होती व अशा घटना होवू नये म्हणून विशेष बाब म्हणून निधी जहीर करावे. आकस्मित निधी ठेवावा अशी विनंती करण्यात येते.

मा.सभापती : ज्या भागात नाल्याच्या बाजूला संरक्षित भिंती पडझड झालेली असेल त्या भागात संबधित अधिकारी यांनी स.सदस्यांना सोबत घेवून पाहणी करावी व नाल्या कडेला राहणारे लोकांना त्रास होवू नये यासाठी नाला संरक्षित भिंतीच्या नावाखाली ६० लक्षची तरतूद केलेली आहे त्यामूळे नाल्याच्या संदर्भात जे काम असेल ते निशिचतपणे त्या हेडमधून करू शकतो. कलम ६७(३)(क) खाली अशी कामे करता येतात हे काम कार्यकारी अभियंता, ड्रेनेजयांचे विभागामार्फत होवू शकते. अशी कामे हाती घेण्यात यावी.

सौ.वंदना खंदारे : महात्मा फुले पुतळयाजवळील नाल्यावर एक मीटर व्यासाचा पाईप काढून दोन्ही साईडने भिंत करण्यात येवून स्लॅब टाकावा कासलीवाल बिल्डर्सचे सांडपाणी इतरत्र जगेतून काढावे इंदिरानगर तसेच बंजारंगनगर मधे मोठया प्रमाणात चिखल झालेला असून मुरूम टाकण्यात यावा.

मा.सभापती : या भागात मी स्वत पाहणी केलेली आहे कार्यकारी अभियंता श्री.कुलकर्णी हे सुध्दा माझ्या बरोबर होते. इंदिरा नगर, काबरानगर ठिकाणची जी बांधकाम परवानगी देण्यात आलेली आहे ती संपूर्ण पाण्याचा निचरा अबाधित ठेवून देण्यात आलेली आहे का? नसेल तर आहे त्या परीस्थितीचा जे पर्यत मार्ग काढत

नाही तो पर्यंत तेथील बाधकामास स्थगिती देण्यात यावी.नसता एक विभाग प्रमूख म्हणून सहा.संचालक नगररचना जबाबदार राहतील. सहा.संचालक यांनी त्याचेकडील असलेल्या अधिकाऱ्याना सूचना करण्यात यावी व होत असलेले सांडपाण्याची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.दिलीप गायकवाड : शहरात कचऱ्याचे मोठे ठिगार पडलेले आहे कचरा उचलला जत नाही यामूळे प्लेग होण्याची भिती आहे. फवारणी मशीन किती आहेत व केंव्हा खरेदी केलेल्या होत्या याची माहिती देण्यात यावी

श्री.मिलींद दाभाडे : या शहरामधे साफसफाइचे काम होते परंतू नालीतील घाण काढल्यानंतर ती घाण कर्मचारी बाजूलाच टाकतात ती घाण उचलण्यासाठी चार चाकी गाडी नाही असे कर्मचारी सांगतात त्यामूळे सर्वच भागातील कचरा उचलण्यासाठी वार्डवाईज गाड्या देण्याची व्यवस्था करण्यात यावी.

श्री.रेणूकादास वैद्य : चार चाकी गाडया तर दिल्याच पाहिजेतसेच कर्मचारी सुध्दा दिला पाहिजेकन्टेनर आणलेले आहे परंतु त्याची संख्या वाढविण्याची गरज आहे चारचाकी गाड्या प्रत्येक वार्डात देण्यात याव्यात.

मा.सभापती :कन्टेनर तसेच चारचाकी गाड्याच्या संदर्भात ज्या ज्या भागातून मागणी झाल्यास विभाग प्रमुखानी त्या गाडया उपलब्ध करून देण्याची कार्यवाही करावी.

आरोग्य वैद्य.अधिकारी : सन २००३ ते २००५ या दरम्यान संपूर्ण शहरासाठी २० फवारणी पंप होते तसेच ५ फोगींग मशीन होत्या मागिल वर्षी उपलब्ध अनुदानानुसार १० फोगींग मशीन नवीन घेतलेल्या आहेततसेच ५० स्प्रेपंप घेतलेले असून प्रत्येक झोनमधे याद्वारे फवारणी केली जते. शहराचा व्याप लक्षात घेता आणखी फोगींग मशीन खरेदी करण्याची गरजपडणार आहे तसेच या वर्षीच्या बजेटमधे जेपंप दुरूस्तीसाठी २ लक्ष ठेवण्यात आलेले आहे त्यातून काही फॉगींग मशीन खरेदी करता येतील व झोनला वाटप करता येतील.

सौ.लता दलाल : या शहराची व्याप्ती मोठी असून एकूण ९८ वार्ड झालेले आहेत.एक फोगींग मशीन एकदा डिझेल व तत्सम औषधी टाकल्यानंतर किती भागात फवारणी करू शकते याची माहिती आहे का?

आरोग्य वैद्य.अधिकारी : किमान एका तासात १०० ते १५० घराच्या परीसरात सदर फॉगींग मशीन फवारणी करते. सध्या १० फॉगींग मशीन आहेत.

सौ.लता दलाल :साधारणत: १२ लक्ष लोकसंख्या या शहराची असून ९८ वार्ड झालेले आहे. १० फोगींग मशीन आहेत एका वार्डात किमान महिन्यातून एकदाच ही मशीन मागणीनुसार पाठविल्या जते. त्यानंतर १५ ते २० दिवसानंतर केव्हातरी पुन्हा ही मशीन वार्डामधे फवारणी केल्या जते. एका फॉगींग मशीन मधे १०० ते १५० घराच्या परीसरात फवारणी होते असे म्हटलेले आहे चार मशीन मिळून १००० घरे होतीं. पुन्हा एक महिन्यानंतर फवारणी होते. काही ठिकाणी कायम स्वरूपी मशीन दिलेल्या असतात त्याचा वापर दुसरीकडे होत नाही. असे असतांना या शाहरात संपूर्ण ठिकाणी औषध फवारणी होते का करू शकतो का फवारणी होत नसेल तर या बजेटमधे खरेदी करण्यासाठी काही तरतूद सुचविलेली होती का.

आरोग्य वैद्य. अधिकारी :वर्कीग डे च्या दिवशी किमान सकाळ व सध्याकाळ असे मिळून प्रत्येक दिवशी किमान १००० घराच्या परीसरात एक मशीन फवारणी करते. बजेटच्या अधिन राहून खरेदी करणार आहोत. आणखी किमान २५ फोंगींग मशीन आवशक आहे.

सौ.लता दलाल : जेऔषध फवारणी करतो त्या मशीनस् किती आहेत

आरोग्य वैद्य.अधिकारी : ५५ हातपंप मशीन आहेत ५० पंप कार्यरत असून ५ नादुरूस्त आहेत आणि प्रत्येक वार्डासाठी स्प्रे पंप आवश्यक असेल तर आणखी ५० घ्यावे लागतील.

सौ.लता दलाल :३० फॉगींग मशीनमधे ९८ वार्डात फवारणी करणार आहात का?

आरोग्य वैद्य अधिकारी: प्रत्येक झोनला ५ फॉगींग मशीन दिल्यानंतर ते कृती आराखडा तयार करून फवारणी करतील.

श्री.मिलींद दाभाडे : जेकर्मचारी वार्डात फवारणी करतात त्यांचेवर देखरेख कोण करते ते फवारणी करतात की घरी जतात याबाबत कोणावर जबाबदारी टाकण्यात आलेली आहे.

आरोग्य वैद्य अधिकारी: यासाठी एक जीवशास्त्रज्ञाचे पद आहे तसेच त्यांचे अंतर्गत एक जेष्ठ सुपरवायझरचे पद आहे तसेच एसएएफडब्ल्यू मार्फत देखरेख ठेवण्यात येते. एकूण ११५ कर्मचारी काम करतात.

श्री.मिलींद दाभाडे : काल कोणत्या भागात फवारणी झालेली आहे याची माहिती देण्यात यावी मागिल दोन तीन दिवसापासून फवारणी झाल्याचे दिसून येत नाही

श्री.बोराडे(सुपरवायझर) : शहरात मा.आरोग्य वैद्यकीय अधिकारी तसेच जीवशास्त्रज्ञ प्रमुख व सुपरवायझर यांचे अतंर्गत ही फवारणी करण्यात येते सदरील कर्मचाऱ्यावर मी सुपरवायझर म्हणून देखरेख ठेवतो. संबधीत फवारणी करणारे कर्मचारी यांना वार्ड नेमून दिलेले असून ते त्या त्या वार्डातील स.सदस्यांच्या सह्या घेवून फवारणी करतात तसेच त्या भागातील नागरीकांच्या सहया सुध्दा घेतात.

श्री.मिलींद दाभाडे : मी पण एक नगरसेवक आहे अदयापपर्यत माझी सही घेतलेली नाही सदर कर्मचारी माझ्याकडे आलेले नाही.

सौ.लता दलाल :आताच अधिकारी यांनी खुलासा केला की आणखी फोगींग मशीन घ्याव्या लागतील परंतू यापूर्वी महानगरपालिकेत जेमोठे रस्ते आहे अशा रस्त्यावर एका जीपवर फवारणी मशीन लावून कार्यवाही करण्यात येत असे यात कमी वेळात जस्त जगेवर फवारणी होते आता तसे करता येणार नाही का? आणि ज्या लहान लहान गल्ल्या आहेत त्या ठिकाणी जेसध्या कार्यरत फोगींग मशीन आहे त्याद्वारे फवारणी करता येईल.

आरोग्य वैद्य.अधिकारी : या संदर्भात मी मा.आयुक्त यांचेशी मागिल वर्षी चर्चा केलेली होती. त्यास व्हेईकल माऊंटेड फॉगींग मशीन काही भागामधे जवू शकते. यापूर्वी फक्त ६ फॉगींग मशीन होत्या आता आणखी १० स्प्रे मशीन घेतलेल्या आहे आणि व्हेईकल माऊंटेड फोंगीग मशीन खरेदी केल्यानंतर कर्मचारी वर्ग ही कमी लागेल जेसूचविलेले आहे ते योग्य आहे.

श्री.दिलीप गायकवाड : आरोग्य व कुटूंब कल्याण सेक्टर इनव्हेस्टमेन्ट समिती यावर डेव्हलपमेंन्ट ऑफिसर नियुक्त केलेले आहे का? नियुक्त केलेले नसेल तर का नियुक्त केलेले नाही याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्य.अधिकारी : या समितीवर ठराविक मानधनावर डेव्हलपमेन्ट ऑफिसर म्हणून श्री.कामटेकर यांची नियुक्ती केलेली होती त्यांना दरमहा १५,०००/- वेतन देण्यात येत होते परंतु ते त्यांचे अडचणीमूळे कामावर येत नसल्यामूळे त्यांचे बरोबर केलेला करार रद्य करण्यात आलेला आहे. त्यानंतर हे पद भरलेले नाही.

श्री. गजनन बारवाल : शहरातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे अनेक भागात दुषित पाणी पिण्याच्या पाण्यामधे येत आहे त्या संदर्भात काही ठिकाणी कार्यवाही केली हे

सत्य आहे तसेच फवारणी होते हे सुध्दा सत्य आहे परंतू आता शहरात माशांचे प्रमाण वाढलेले आहे डासांचे प्रमाण वाढलेले असून काही नागरीकांना कावीळची लागण झालेली आहे. यासाठी काय उपाययोजना करता येतील त्या करण्यात याव्यात.

श्री.नासेर नहदी : महानगरपालिकेने मोठमोठे दवाखाने बांधलेले असून शहरातील नागरीक या दवाखान्यात न जता इतर खाजगी दवाखाना किंवा घाटी दवाखान्यामधे जतात याचे कारण काय महानगरपालिकेच्या दवाखान्यात योग्य त्या सवलती किंवा औषधोपचार केले जत नाही का याची माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्य अधिकारी: महानगरपालिकेच्या दवाखान्यामधे पूर्वीपेक्षा जस्त लोकांना सेवा दिलेली आहे त्याचे रेकॉर्ड माझ्याकडे आहे. मागिल वर्षात १०० ऑपरेशन झालेले होते सन २००३ ते २००५ या काळात ६०० ऑपरेशन झालेले आहेत.एकाच दवाखान्यामधे ५० ते ६० गरोदर माताचे बांळातपण होत होते परंतू मागिल वर्षात एकूण ७०० गरोदर मातांचे बांळातपण झालेले आहे शासकीय महाविदयालयापेक्षाही लसीकरणाचे काम महानगरपालिकेचे चांगले आहे.

श्री.नासेर नहदी : चांगल्या सुविधा देत असतांनाही दवाखाना बंद का पडत आहे याची माहिती देण्यात यावी.

श्री. गजनन बारवाल : रमानगर येथील दवाखाना बंद का झालेला आहे. तेथे जनावरांसाठी कोडवाडा झालेला आहे असे स.सदस्य बोलत आहे. ही सत्य परीस्थिती आहे का.

श्री.रेणूकादास वैद्य : रमानगर येथील दवाखाना बंद असून कोणतीही सूविधा देण्यात येत नाही. निव्वळ कोंडवाडा झालेला आहे. तर अशी दुर्दशा का व्हावी.

श्री. गजनन बारवाल : मा.महापौर यांचे अध्यक्षतेखाली एक उपक्रम सुरू करून दवाखान्यामधे सायकांळच्या वेळी ओपीडी सुरू केलेली आहे त्यास चांगला प्रतिसाद मिळत आहे सध्याची परीस्थिती काय आहे माहिती देण्यात यावी.

आरोग्य वैद्य. अधिकारी : दुपारी ३ ते ५ या वेळात पाच रूग्नालयात ओपीडी सुरू केलेली आहे.पहिल्याच दिवशी २५० रूग्नाची तपासणी केलेली आहे.दिवसेंदिवस संख्या वाढते आहे.अडचण एकच आहे की २४ तास दवाखाना चालू असतो त्यामूळे डॉक्टरांची संख्या कमी असून कायम स्वरूपी १६ डॉक्टर आहेत आणि ३० ठिकाणी ओपीडी काढलेली आहे.पाच ठिकाणी २४ डॉक्टरांच्या सेवा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कॉन्ट्रक्ट बेसीकवर जेडॉक्टर आहेत ते १३ आहेत.

श्री.रेणूकादास वैद्य : रमानगर येथील दवाखाना सुरू करण्यास काय अडचण आहे, याचा खुलासा करावा. तेथे टेबल खुर्ची सुध्दा नाही.

आरोग्य वैद्य अधिकारी: रमानगर येथील दवाखान्यात दोन तास ओ.पी.डी. चालते.

श्री.बारवाल गजनन : चुकीची माहिती देवू नये स.सदस्य सांगातात तेथे टेबल खुर्ची नाही अधिकारी सांगतात ओपीडी सुरू आहे.

सौ.लता दलाल : सेक्टर इनव्हस्टमेन्ट प्रोजेक्ट राबविला जतो त्यासाठी किती निधी प्राप्त झालेला आहे व वापरलेला आहे का २४ तास दवाखान्यासाठी वापरला असेल तर रमानगर येथील दवाखान्यासाठी ही तो वापरता आला असता. किती निधी आलेला असून कोठे वापरला आहे माझ्या माहिती प्रमाणे फॉरेन्स फंडस् मिळालेले आहे.तसेच विशेष निधी मिळालेला आहे.

आरोग्य वैद्य अधिकारी: सविस्तर माहिती दिली जईल परंतू त्या संदर्भात १.३० कोटीचा निधी प्राप्त झालेला होता. त्यातून आतापर्यत १.२२ कोटी खर्च झालेले आहे ही सर्व माहिती माझ्याकडे उपलब्ध आहे थोडयाच वेळात माहिती देण्यात येईल. सेक्टर इनव्हस्टमेन्ट प्रोग्राममध्ये ६ दवाखान्यांचा समावेश केलेला आहे. सहा दवाखान्याचे अपग्रेडेशन करायचे आहे त्यापैकी चार दवाखान्याचे अपग्रेडशन केलेले आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : अधिकारी सांगतात अपग्रेडेशन करायचे परंतु जेथे इमारती आहे तेथे काहीच सुविधा सुरू केलेल्या नाही त्याकडे लक्ष दयावे असे माझे मत आहे.

मा.सभापती : फॉगींग मशीनच्या बाबतीत मुद्दा उपस्थित केलेला आहे चारचाकी वाहनावर फवारणी करणे शक्य नसेल तरी दोन चाकी वाहनावर फोगींग मशीन घेवून फवारणी करण्यात यावी. जस्तीत जस्त भागात फवारणी कशी होईल त्या प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.यासाठी दोन चाकी वाहनाला जे पेट्रोल खर्च येईल त्यासाठी कार्यवाही करावी. तसेच आरोग्य विभागासाठी ज्या ज्या इमारती बांधलेल्या आहेत काही इमारती पडलेल्या आहेत त्याची दुरावस्था झालेली आहे त्या संदर्भात एक महिण्याच्या आत त्या दुरूस्त करून तेथील दवाखाना चालू करण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. फवारणी करणारे कर्मचारी यांनी या सभागृहातील किती स.सदस्यांच्या सहया घेतलेल्या आहेत याचा काहीही अहवाल अधिकाऱ्याकडे नाही जी माहिती विचारलेली आहे ती सभागृहात सादर करावी. कर्मचारी ज्या पध्दतीने काम करतात त्यात सुधारणा करून आपल्या मार्गदर्शनाखाली त्यांचेकडून काम करून घ्यावे. त्यामधे कुचराई होता कामा नये.

श्री.रेणूकादास वैद्य : पाणी पुरवठा हा विभाग महत्वाचा असून जनतेच्या जिव्हाळयाचा प्रश्न आहे. दरवर्षी या चिभागावर जस्तीत जस्त बजेट तरतूद केली जते परंतू होणारा खर्च हा योग्य रित्या होतो की नाही हे बघण्याचे कामही या सभागृहाचे आहे त्यासाठी पाणी लेखापरीक्षण होते का होत असेल तर केव्हापासून व कोणाकडे दिलेले आहे तसेच या विभागात तांत्रिक सल्लागार म्हणून कोणाची व केव्हापासून नियुक्ती केलेली आहे माहिती देण्यात यावी.

कार्य.अभियंता(पापु) : पाणी लेखापरीक्षणाचे काम एप्रिल २००५ पासून देण्यात आलेले असून तांत्रिक सल्लागार म्हणून जीवन प्राधिकरणाचे निवृत्त अभियंता श्री.जवळे यांची नेमणूक केलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : पाण्याचे लेखापरीक्षण केले जते त्याचेकडून कोणती कामे करून घेतली जतात.

कार्य.अभियंता(पापु) : जे पाणी पंपींग करून आणल्या जते पंपीग झालेले पाणी व प्रत्यक्षात मिळणारे पाणी किती आहे यांचे संपूर्ण कॅल्क्यूलेशन ते करून देतात. तसेच महाराष्ट्र विदयूत मंडळाला जी बीले दिली जतात त्या बिलानुसार महानगरपालिकेला किती दर आकारावे व वर्षाभरामध्ये किती तोटा येतो याचे संपूर्ण ऑडीट ते करून देतात.तसेच महानगरपालिकेची होणारी पाण्याची चोरी याकडे लक्ष वेधण्याचे काम त्यांचेकडेच आहे.

:श्री.रेणूकादास वैद्य : सदर एजन्सीला केव्हापासून काम दिलेले आहे दिनांक ३१.५.२००५ रोजी एमआयडीसी पैठण पोलीस स्टेशनला पाणी चोरीबाबत महानगरपालिकेच्याच कनिष्ठ अभियंता यांनी गुन्हा दाखल केलेला आहे. चोरी पकडण्यासाठी पाण्याचे नियोजनासाठी लाखो रूपये खर्च करीत आहोत व चोरी होते ती पकडून ज

महानगरपालिकेच्याच अभियंत्यांना पोलीसात गुन्हा दाखल करावा लागत असेल तर ही एजन्सी बरोबर काम करते आहे की नाही जर करीत नसेल तर लाखो रूपयाचा खर्च हा वाया जतो का ?

मा.सभापती : ऑडीट रिपोर्ट आपल्या समोर येईल त्यावेळी चर्चा करता येईल.

श्री.रेणूकादास वैद्य : सदर एजन्सीला काम दिल्यानंतर चोरीचा प्रकार उघडकीस आलेला असून या एजन्सीज्ने चोरी उघडकीस आणून दिलेली नाही महापालिकेच्याच अभियत्यांनी चोरी पकडून गुन्हा दाखल केलला आहे याचा अर्थ ही एजन्सी चांगले काम करीत नाही असे माझे मत आहे.

कार्य.अभियंता(पापु.) : तांत्रिक सल्लागार म्हणून जीवन प्राधिकरणाचे निवृत्त उपअभियंता श्री.जवळे यांची १ जनेवारी २००५ पासून नियुक्ती केलेली आहे. एकच तांत्रिक सल्लागार म्हणून नियुक्त केलेले आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : माझ्या माहिती प्रमाणे श्री.नरसापूरकर हे तांत्रिक सल्लागार म्हणून काम करतात.

उपअभियंता(पापु) : जयकवाडी विभागासाठी तांत्रिक सल्लागार म्हणून श्री जवळे यांची नियुक्ती केलेली आहे तसेच मा.उच्च न्यायालयाने जे समिती नियुक्त केलेली पाणी तपासणी व पाण्याचे नियोजनाबाबत त्यामधे श्री.नरसापूरकर यांची नियुक्ती केलेली आहे.

श्री.रेणूकादास वैद्य : माझ्या माहिती प्रमाणे कनिष्ठ अभियंता हे सक्षम असतांना दोन तांत्रिक सल्लागार ठेवण्याची आवशकता नाही असे मला वाटते.

मा.सभापती :मा.न्यायालयाच्या आदेशानुसार ज्यांची नियुक्ती केलेली आहेत त्यांना वेतन दिले जते का? ज्यांना वेतन दिले जते त्यास सभागृहाची मान्यता घेण्यात आलेली आहे का खुलासा करावा.

उपअभियंता (पापु) : माझ्या माहिती प्रमाणे श्री नरसापूर यांना वेतन दिले जत नाही माहिती घेवून दिली जईल.सभागृहाच्या मान्यते विषयी मला माहिती नाही पूढील सभेत माहिती देण्यात येईल.

मा.सभापती : उपअभियंता श्री निकम यांनी बांधकाम विभागाकडे जस्त लक्ष न देता जे पाणीपूरवठा विभागाचा सिडको भागाचा चार्ज दिलेला आहे त्याकडे जस्त वेळ देण्यात यावे अशा सूचना करण्यात येत आहे.

श्री.दिलीप गायकवाड : शहरातील मोठमोठया हॉटेल आहेत त्यांना किती इंची नळ कनेक्शन देण्यात आलेले आहे माहिती देण्यात यावी.

उपअभियंता (पापू) : माहिती घेवून देण्यात येईल.

मा.सभापती : स.सदस्य श्री. दिलीप गायकवाड यांना लेखी स्वरूपात माहिती देण्यात यावी.

श्री.दाभाडे मिलींद : रेकॉर्ड नुसार नळ कनेक्शन आहेत की त्यापेक्षा जस्त इंचीचे नळ कनेक्शन घेतलेले आहेत याची चौकशी अधिकारी यांनी केलेली आहे का ?

मा.सभापती :या बाबतीत पाहणी करावी .विषय पत्रिकेवर चर्चा करावी.

**<u>विषय क्र १६</u>**

दिनांक २०.६.२००५ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**<u>संवाद :</u>**

श्री.बारवाल गजनन : पान क्र.३ वर स.सदस्या सौ.लता दलाल यांनी शाळेच्या संदर्भात तसेच शिक्षकांच्या संदर्भात संपूर्ण माहिती मागविलेली होती ती संपूर्ण माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : आजच्या बैठकीला शिक्षणाधिकारी उपस्थित नाही असे वाटते. मला त्यांनी कुठलीही कल्पना दिलेली नाही विभाग प्रमुख म्हणून उपआयुक्त यांनी माहिती दयावी त्यांनी रज दिलेली आहे का ते कोणत्या कामासाठी गेलेले आहे.

उपआयुक्त(प्र) : शिक्षणाधिकारी हे कालच मुंबईला एका महत्वाच्या बैठकीसाठी गेलेले आहे उपसंचालक यांनी बैठक आयोजित केलेली आहे. शासनाचे सचिव यांचे एक पत्र त्यांचेकडे होते त्या बैठकीला जणे आवशक आहे असे त्यांनी सांगितलेले आहे.त्यांचे बरोबर श्री.बावस्कर नावाचे शिक्षक ही गेलेले आहे.कार्यालयामधे तशी संचिका माझ्याकडे सादर झालेली होती. जे चर्चा झालेली होती त्या संदर्भात उपआयुक्त महसूल यांचेकडे माहिती असेल.

उपआयुक्त(म.) :दिनांक २०.६.२००५ च्या स्थायी समितीमधे शिक्षण विभागाच्या संदर्भात मुद्दे उपस्थित झालेले होते. शिक्षण विभागाचे किती शिक्षक हे निवडणूक कामासाठी आहेत तसेच याची मी माहिती घेतल्यानंतर एकूण १३ शिक्षकहे निवडणूक कामासाठी मा.जिल्हाधिकारी कार्यालयाकडे होते त्यांना पत्र दिल्यानंतर तात्काळ १२ शिक्षकांना कार्यमुक्त केलेले आहे.या शिक्षकांना अशी अट घातलेली होती की जेपर्यंत त्या विभागाकडून कार्यमुक्त होत नाही तोपर्यंत वेतन अदा करण्यात येणार नाही. १२ शिक्षक कामावर रूजू झालेले असून एकच शिक्षक आता मा.जिल्हाधिकारी कार्यालय यांचेकडे आहे.दुसरा मुद्दा असा होताकी महापालिकेच्या शाळेत उर्दू व मराठी माध्यमच्या शाळेमधे शिक्षक किती आहेत त्यांचा आढावा घेण्यात यावा. सर्व शाळाचा आढावा घेतला असता महानगरपालिकेच्या ८१ शाळापैकी मराठी माध्यमचे शिक्षक हे २७ शाळेमधे निकषापेक्षा जस्त आहे. तर ३५ शाळामधे शिक्षक हे निकषा पेक्षा कमी आहेत. उर्दू शाळामध्ये १० शाळामधे शिक्षक हे निकषापेक्षा जस्त आहेत तर १६ शिक्षक हे निकषा पेक्षा कमी आहेत. या दोन्ही माध्यमच्या शाळामधे जेथे शिक्षक कमी आहे तेथे शिक्षक देण्याचे समायोजन चालू आहे मी स्वत: एक दोन शाळेमधे भेटी दिल्या असता असे लक्षात येते की उदा बन्सीलाल नगर येथे ७ वीचे दोन वर्ग आहे एका वर्गात २६ तर दुसऱ्या वर्गात २५ विदयार्थी आहेत दोन वर्ग एकत्र केले तर एक शिक्षक उपलब्ध होवू शकेल. अशा प्रकारे कार्यवाही सर्व शाळाच्या संदर्भात अवलंबित आहोत. समायोजनाची प्रक्रिया ८ दिवसात पूर्ण होईल.

सौ.संगिता जधव :जयभवानीनगर भागात महानगरपालिकेची शाळा असून चार वर्ग सुरू करण्यात आलेले आहे त्या शाळेवर एकच शिक्षक असून एक शिक्षक काय काय कामे करील आणखी शिक्षक देण्यात यावेत.

उपआयुक्त (म) :ज्या शाळेवर शिक्षक कमी आहे तेथे शिक्षक देण्यात येतील निकषा बाबत शासनाचे वेगवेगळे संख्येनिहाय असते. एकच शाळा असेल वर्ग १ ते ४ पर्यंत असतील एका वर्गासाठी एक शिक्षक त्यावर्गात किमान ३० मुले असावीत. या सर्व बाबतीत विचार करूनच आढावा घेत आहोत.

श्री.रविकान्त गवळी : सेन्ट्रल जेलची शाळेत चार वर्ग एकाच हॉल मधे चालविले जतात.पाच ते सहा वर्षापूर्वी ती इमारत पडण्याच्या अवस्थेत होती तर सदर इमारत ही बीॲण्ड सी खात्याने पाडलेली आहे. त्यानंतर शाळेसाठी जगा पाहिजेहोती सेन्ट्रल जेल जगा देण्यास तयार आहे. महानगरपालिकेने फक्त अहवाल पाठवायचा आहे कि किती जगा लागणार आहे परंतू संबधित विभागास वारंवार विनंती केली की त्या

ठिकाणी जगा आहे जवून सर्वे केला तर माहिती मिळू शकेल परंतू शिक्षणाधिकारी जत नाही आजच्या स्थितीला शाळा ही एका व्यायाम शााळेच्या इमारतीत भरत आहे. चार वर्ग असून एकच शिक्षक ५ वर्षापासून कार्यरत आहे.आणखी एक शिक्षकाची आवशकता आहे. याची नोंद घेवून कार्यवाही करावी.

श्री.मिलींद दाभाडे : चार वर्ग मिळून एकच शिक्षक शिकवित असेल तर त्या शिक्षकांचा सत्कार केला पाहिजेत्यांना मानचिन्ह दिले पाहिजे

श्री.दिलीप गायकवाड :ज्या शाळेसाठी मैदान नाही अशा शाळेतील क्रिडा शिक्षक काय काम करतात.

श्री.रेणूकादास वैद्य : महानगरपालिकेच्या शाळेत माझ्या माहिती प्रमाणे क्रिडा व संगित शिक्षकच नाहीत ते असणे आवशक आहे. या दृष्टीने ठोस पावले उचलण्याची गरजआहे.

श्री.दिलीप गायकवाड : माझ्या माहिती प्रमाणे ११ क्रिडा शिक्षक असून जेथे मैदान नाही अशी उस्मानपूरा भागातील मुलीची शाळा येथे अनुज चितळे क्रिडा शिक्षक म्हणून काम करतात. तसेच नागेश्वरवाडी भागातील शाळेमध्ये १०द१५ आकाराचे मैदान आहे व क्रिडा शिक्षक आहे परंतु तेथे पुरेसे मैदान नाही.

श्री. रेणूकादास वैद्य : उस्मानपूरा येथील शाळेला मैदान आहे.

सौ.लता दलाल स.सदस्यांना कदाचित कुणीतरी चुकीची माहिती दिलेली असेले. नागेश्ववाडी येथील शाळेला मैदान मोठे आहे लहान नाही परंतु शासनाच्या चुकीच्या आदेशामूळे व शिक्षण विभागाने केलेल्या चुकीच्या निर्णयामूळे आणि बांधकाम विभागाने केलेल्या चुकीच्या निर्णायामूळे जे सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत जे हॉल बांधायचा असतो तो हॉल शाळेच्या दुसऱ्या इमारतीला लगत न बांधता इतर ठिकाणी बांधलेले असल्यामुळे आता मैदान लहान झालेले आहे.

मा.सभापती :याचा अर्थ स.सदस्यांना कार्यालयातून कोणीतरी चूकीची माहिती देत आहे याची प्रशासनाने दखल घ्यावी यामूळे महानगरपालिकेची बदनामी होत आहे.तसा अहवाल सादर करावा.

श्री.रेणूकादास वैद्य :उस्मानपूरा येथील शाळेत एक वॉचमन यांनी दोन खोल्याचे घर बांधलेले आहे तो त्या शाळेत कर्मचारी आहेत का, याबद्दलचा खुलासा अद्याप समोर आलेला नाही.

श्री.दिलीप गायकवाड :एन ७ भागात मोठी महापालिकेची शाळा असून तेथे मैदान आहे, क्रिडा शिक्षक नाही तसेच एन १२ भागातही महानगरपालिकेची शाळा असून तेथेही मोठे मैदान असतांना क्रिडा शिक्षक नाही ज्या शाळेला मैदान आहे तेथे क्रिडा शिक्षक नियुक्ती का दिलेली नाही.

सौ.लता दलाल :काही शिक्षक १० ते १२ वर्षापासून एकाच शाळेमधे कार्यरत असून काही शिक्षकांनी घराजवळील शाळेत सेवा करीत आहेत. शाळेत नाममात्र जवून काही शिक्षक साईड बिजनेस करीत आहे. त्यामुळे अशा शिक्षकांच्या त्वरीत बदल्या कराव्यात म्हणून मागिल बैठकीत मुद्या उपस्थित केलेला होता. बदल्या केल्या तर शैक्षणिक क्षेत्रात भर पडेल व त्यांचेमधे असलेले शैथिल्य हे दूर होईल.काही शाळेत प्रभारी मुख्याधयापक आहे काही कामाबाबत सुचना दिली की मी प्रभारी म्हणून काम करीत आहे असे सांगतात त्यासाठी कायमस्वरूपी मुख्याध्यापक देणेत यावे.

मा.सभापती : महानगरपालिकेच्या शाळेत क्रिडा शिक्षक किती आहे याची चौकशी करून ज्या शाळेला मैदान आहे अशा शाळेत क्रिडा शिक्षक नसतील तर क्रिडा शिक्षक देण्यात यावेत. माझ्या माहिती प्रमाणे एन ६, एन७, एन९ या तिन शाळेसाठी एक

क्रिडा शिक्षक दिलेले आहे. विदयार्थ्यांच्या संख्येनुसार शिक्षक सेवकांची आवशकता असेल तर तशी शासनाची मान्यता घेवून कार्यवाही करावी माझ्या माहिती प्रमाणे महानगरपालिकेच्या शाळेत मागिल वर्षी पेक्षा या वर्षी कमी विदयार्थी असून एकुण ५६४ शिक्षक कार्यरत असून हीच शिक्षक संख्या जस्त हावू शकेल त्यासाठी काही शिक्षकाच्या प्रतिनियुक्त्या जिल्हा परीषदेत करण्याचा विचार करावा लागणार आहे.शाळेच्या इमारतीत कोणी वॉचमन म्हणून निवासस्थानाचा वापर करीत असेल तर प्रशासनाने तात्काळ कार्यवाही करावी. तसेच संगित शिक्षक देण्याची कार्यवाही करावी.तसेच शालेय पुस्तके व इतर साहित्य पुरविले जतात त्याचा लाभ विदयार्थ्यांना होतो किंवा नाही याची दखल प्रशासनाने घ्यावी.या विभागावर वारंवार चर्चा करण्याची गरजपडणार नाही याची दखल घेण्यात यावी शाळेच्या गुणवत्ता वाढीसाठी जेकाम करावे लागणार आहे ते हाती घेण्यात यावे. हर्सूल जेलच्या शाळेसाठी जगा देण्यास तयार असेल तर ती जगा ताब्यात घेवून कार्यवाही करावी तसेच काही शाळेवर चार वर्गासाठी एकच शिक्षक आहेत अशा शाळावर शिक्षकाची संख्या वाढवावी व गरीब मुलांना किमान १ ते ४ थी पर्यतचे शिक्षण कसे देता येईल यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी अशा सूचना देण्यात येतात.

श्री.दिलीप गायकवाड : एस.टी महामंडळाचे पत्र बस सेवा चालविण्यासाठी पत्र आले तर बस सेवा चालविण्यासाठी महानगरपालिका घेणार आहात का?

मा.सभापती :दळणवळणाच्या दृष्टीने बस सेवा महानगरपालिकेने देण्याचा एक भाग आहे.औरंगपूरा हा शहराचा एक केद्रबिंदू मानला जतो मोठमोठया संस्थेमध्ये जर विदयार्थ्यांना प्रवेश घ्यावयाचा असेल तर शिक्षण घ्यायचे असेल तर एस.टी महामडंळाने जी बस सेवा उपलब्ध करून दिली आहे ती पूरेशी नाही असे माझे मत आहे.नागपूर पूणे इतर महानगरपालिकेमधे ज्या काही खाजगी वाहतूक संस्थेने बीओटी पध्दतीने बससेवा देण्याचे स्विकारलेले आहे.इतर महानगरपालिकेचा अहवाल मागवून घ्यावा त्यानंतर या सभागृहात ठराव घेवून सर्वसाधारण सभेत पाठवून पुढील कार्यवाही करण्यात येईल. विषय क्र १६ मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

दि.२०/६/२००५ रोजे संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**<u>विषय क्र. १७ :</u>**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(अ) च्या तरतुदीतहत महापालिका क्षेत्रासाठी प्रतिवर्षी पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार करणे आवश्यक असून तो अहवाल प्रतिवर्षी दिनांक ३१ जुलै पुर्वी प्रसिध्द करणे बंधनकारक आहे.

औरंगाबाद महापालिका क्षेत्रासाठी या वर्षाकरीता म्हणजे २००५ करीता अहवाल तयार करून तो दिनांक ३१.७.२००५ पुर्वी प्रसिध्द करण्याचे कार्यवाही अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येतो की, पुणेस्थित **''मशाल''** संस्थेने मागील वर्ष २००४ करीता औरंगाबाद महापालिका क्षेत्रासाठी पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार केला होता. त्याकरीता त्यांना रू.१.५० लक्ष देण्यात आले होते. या वर्षाकरीता पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार करणेसाठी **''मशाल''** संस्थेस विचारणा करता त्यांनी या वर्षाकरीता हे काम मागील वर्षाचे दरापेक्षा १०% कमी दराने म्हणजेच रू.१.३५ लक्ष मध्ये करण्यास तयार असल्याचे मान्य केलेले आहे. उपलब्ध कालावधी पाहता उक्त काम ''मशाल'' या संस्थेकडून

त्यांचे नमूद रक्कम रू.१.३५ लक्ष मध्ये करून घेण्याबाबत मा.आयुक्तांनी मा.स्थायी समितीच्या मान्यतेस्तव शिफारस केलेली आहे. करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : मागील वर्षी मशाल या संस्थेने पर्यावरण अहवाल १.५० लक्षमध्ये करून दिला होता. यावर्षी सदर संस्था १५% कमी दराने करून देण्यास तयार आहे. मागील २-३ वर्षाचाही पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल याच संस्थेने तयार केलेला होता. सदर संस्थेमार्फत कोणत्या ठिकाणी सर्व्हे केला जतो, किती कर्मचारी असतात, प्रत्यक्ष काम करतात की नाही? माझ्या माहितीप्रमाणे फक्त कागदोपत्री आकडेवारी देऊन टेंडर पास करून घेतात का? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्री.गजनन बारवाल : मागील अहवाल आपणांकडे आहे का? हा विषय मंजूर करणे आवश्यक आहे. ३१/७/२००५ पर्यंत त्यांना हे काम करून द्यावयाचे आहे.

श्री.रविकांत गवळी : आज२० तारीख असून ३१/५/२००५ पर्यंत अहवाल सादर करावयाचा आहे. १० दिवसात हे काम होईल का?

मा. सभापती : पर्यावरण सद्य:स्थिती बाबतचा अहवाल हा प्रत्येक वर्षी करण्यात येतो. हे काम संस्थेला देण्यासाठी स्थायी समिती, सर्वसाधारण सभेपुढे प्रस्ताव येतो. परंतु वेळेचे बंधन न पाळता ऐनवेळेस हा प्रस्ताव सादर होतो ही दुर्दैवी बाब आहे. यावर चर्चा होणे आवश्यक असून नागरीक व लोकप्रतिनिधी यांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे. तरच पर्यावरण संद्य:स्थितीत आपण यशस्वी होऊ शकू. नुसता अहवाल प्राप्त करून घेणेसाठी एखाद्या संस्थेला काम द्यायचे व तो विषय संपवायचा ही पध्दत बंद झाली पाहिजे मागील अहवाल असेल तर दाखवावा. या विषयास मंजुरी दिली तरी पुढील सभेत यावर चर्चा करू. हा विषय मंजूर करण्यात येत आहे. मागील वर्षीच्या अहवालाची प्रत सर्व स.सदस्यांना पुरवावी.

श्री.गजनन बारवाल : फक्त एकच संस्था आहे की इतरही संस्था असतील तर त्यांचेकडून अहवाल करून घ्यावा. १० दिवसात काम करून अहवाल सादर करणे शक्य होईल का? नाममात्र काम करतात आणि अहवाल सादर करतात असे माझे मत आहे.

मा. आयुक्त : मशाल ही पुण्याची संस्था आहे, चांगले काम करते. इतर मनपातही पर्यावरण अहवाल ही संस्था तयार करते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(अ) च्या तरतुदीतहत महापालिका क्षेत्रासाठी प्रतिवर्षी पर्यावरण सद्य:स्थिती अहवाल तयार करण्याचे काम पुणेस्थित ''मशाल'' या संस्थेकडून त्यांचे नमूद रक्कम रू.१.३५ लक्ष मध्ये करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८ :**

मुख्य पशुसंवर्धन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मनपा पडेगांव कत्तलखाना (मोठ्या जनावरांकरीता), शहाबाजर कत्तलखाना (लहान जनावरांकरीता) कत्तल फी प्रति जनावर रूपये ५/- प्रमाणे वसुली करीता सन २००५-२००६ (१.७.२००५ ते ३१.३.२००६) या काळासाठी जहीर लिलाव दोन वेळा वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन लिलाव दिनांक २५.५.२००५ रोजी उप आयुक्त (प्रशासन) यांचे दालनात ठेवण्यात आला. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१) शहाबाजर कत्तलखाना(लहान जनावरांकरीता):- एकूण ३ व्यक्तींनी बोली मध्ये भागत घेतला असून त्यामध्ये सर्वात जस्त बोली रू.२.०० लाख श्री.मो.अजगर फतेमहंमद यांनी बोली बोलली आहे. त्यामुळे त्यांना वर्ष (१.७.२००५ ते ३१.३.२००६) या कालावधीकरीता लिलाव देण्यास हरकत नाही.

२) पडेगांव कत्तलखाना (मोठ्या जनावरांकरीता):- या लिलावासाठी दोन्ही वेळा कोणीही लिलावाकरीता आलेले नाही. तरी गत वर्षाप्रमाणे यावर्षीही (१.७.२००५ ते ३१.३.२००६) मनपाकडून कत्तल फी वसुल करण्यात येईल.

करीता वरीलप्रमाणे प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

श्री.दिलीप गायकवाड : लिलावासाठी कोणीही आले नाही असे म्हटले. यात काहीतरी गौडबंगाल आहे. पुन्हा टेंडर कॉल करावे.

श्री.गजनन बारवाल : दोन वेळेस टेंडर कॉल केलेले आहे. पुन्हा टेंडर काढण्याची आवश्यकता नाही. मंजूर करावा.

श्री.रविकांत गवळी : मोठ्या जनावरांसाठी पडेगांव येथे कत्तलखाना आहे. लहान जनावरांसाठी शहाबाजर येथे कत्तलखाना आहे. जे ५/- रूपये दर आकारले आहे ते मोठ्या जनावरांसाठी यात वाढ करण्यात यावी. शहरात शहाबाजर व पडेगांव येथे कत्तलखाना आहे. या व्यतिरिक्त कुठेच जनावरांची कत्तल होत नाही का?

श्री.दिलीप गायकवाड : काही लोक घरामध्ये त्यांचे वाड्यामध्ये कत्तल करतात. अशी परिस्थिती आहे. पुन्हा टेंडर कॉल करावे.

मा. सभापती : संबंधीत विभागाचे अधिकारी रजेवर आहेत. परंतु विभाग प्रमुख म्हणून उप आयुक्त उपस्थित आहेत. या शहरात जेथे अवैध कत्तल केली जते ती बंद करण्याबाबत कार्यवाही करावी व पडेगांव कत्तलखाना येथेच १००% जनावरांची कत्तल झाली पाहिजे. यापुढे शहरात कोणत्याही भागात अवैध कत्तल कोणी करीत असेल व तसा रिपोर्ट या सभागृहाच्या निदर्शनास आल्यास कार्यवाही करण्यात येईल. तसेच केंद्र शासन व राज्य शासनाचे यासाठी काही अनुदान प्राप्त होत असेल तर तसे प्रयत्न करावे व अनुदान प्राप्त झाल्यानंतर पडेगांव येथे कत्तलखाना चांगल्या प्रकारे अद्ययावत करण्यासाठी प्रयत्न करावे. दोन वेळा या बाबतीत टेंडर झालेले आहे. फारशी स्पर्धा दिसून येत नाही. महत्वाचा विषय असल्यामुळे मान्यता देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मनपा पडेगांव कत्तलखाना (मोठ्या जनावरांकरीता), शहाबाजर कत्तलखाना (लहान जनावरांकरीता) कत्तल फी प्रति जनावर रूपये ५/- प्रमाणे वसुली करीता सन २००५-२००६ (१.७.२००५ ते ३१.३.२००६) या काळासाठी करण्यात आलेल्या जहीर लिलावानुसार

१) शहाबाजर कत्तलखाना(लहान जनावरांकरीता) करीता सर्वात जस्त बोली रू.२.०० लाख श्री.मो.अजगर फतेमहंमद यांना लिलाव देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच (२)पडेगांव कत्तलखाना (मोठ्या जनावरांकरीता) गत वर्षाप्रमाणे यावर्षीही (१.७.२००५ ते ३१.३.२००६) मनपाकडून कत्तल फी वसुल करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९ :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.१६.५.२००५ नुसार दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद या वर्तमानपत्रात जहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.१९.५.२००५ ते २१.५.२००५ या कालावधीत एकूण ९(नऊ) निविदा विक्री झाल्या व दि.३.६.२००५ रोजे एकुण ६(सहा) निविदा प्राप्त झाल्या. एकूण ६(सहा) निविदाधारकांनी दिलेल्या दरानुसार सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जेडल्याप्रमाणे असुन अधोरेखीत केलेले दर हे त्या त्या निविदा धारकांचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर आहेत. त्याचप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षासाठीचे मान्य दराचा उल्लेखसुध्दा तुलनात्मक दराच्या तक्त्यात नमुद करण्यात आलेला आहे.

प्राप्त कमी दर हे अत्यंत स्पर्धात्मक दर आहेत, त्याचप्रमाणे बाजरातील दरापेक्षा सरासरी कमी दर असून एकूण १६१ आयटम पैकी ११ आयटम मध्येच थोड्याफार प्रमाणात गत वर्षीच्या मान्य दरापेक्षा जस्त दर असुन त्यामुळे फक्त अंदाजे रू.७०००/- जस्तीचा खर्च अपेक्षित आहे. खालील प्रमाणे निविदाधारकांची नांवे देण्यात येत असून त्यासमोर त्या त्या निविदाधारकांनी भरलेला तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचेएकुण आयटमचा उल्लेख केलेला आहे.

१) मे.लिबर्टी प्रिन्टर्स, औरंगाबाद — एकूण ४५ आयटम
२) मे.विशाल इंटरप्रायजेस, औरंगाबाद — एकूण ४० आयटम
३) मे.श्री गणेश प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद — एकूण ७७ आयटम
४) मे.जयभारती एक्स.बुक मॅन्यु.कंपनी,औरंगाबाद — एकूण ०५ आयटम
५) मे.राका प्रिन्टर्स, नाशिक — एकूण १० आयटम
६) मे.न्यु रत्नमाला प्रिन्टर्स अँड सप्लायर्स, औरंगाबाद — एकूण ०१ आयटम

उपरोक्त आयटममध्ये एकूण १३ आयमटममध्ये दोन निविदाधारकांचे दर समान असुन एका (१) आयटमसाठी तीन निविदा धारकांचे दर समान आहेत. एकुण अंदाजित खरेदी जकात विभागासाठी रू.६.०० लक्ष, शिक्षण विभागासाठी अंदाजेरू.४.५० लक्ष तर सर्वसाधारण छपाईसाठी अंदाजेरू.६.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. यासाठी अंदाजे रू.२०.०० लक्ष अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात येत आहे. सदर निविदेस मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : लिबर्टी प्रिंटर्स, रत्नमाला प्रिंटर्स यांनी मागील वेळेस छत्रपती शिवाजी महाराज यांचा फोटो उलटा छापलेला होता. त्यांना ब्लॅकलिस्ट करण्यात आले होते. पुन्हा टेंडर कसे भरले, माहिती देण्यात यावी.

मा. सभापती : यासंबंधी खुलासा करण्यात यावा.

भांडार लेखापाल : लिबर्टी प्रिंटर्स यांना मागच्यावेळेस लेखा विभागामार्फत छपाईचे काम देण्यात आले होते. परंतु काळ्या यादीत समावेश केलेला नव्हता. त्यामुळे लिबर्टी प्रिंटर्सची निविदा स्विकारण्यात आलेली होती.

श्री.रविकांत गवळी : संबंधीत एजन्सीकडून छपाईमध्ये चुकी झालेली होती. त्यांना काम देणे योग्य नाही. प्रत्यक्ष चुक निदर्शनास आणून दिली तर काय कार्यवाही करणार.

मा. आयुक्त : चुक झाली होती, दुरूस्त करून दिली. परंतु सदर एजन्सीचा काळ्या यादीत समावेश केलेला नव्हता. काम देण्यास हरकत नसावी.

मा. सभापती : आताच स.सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे सदर एजन्सीचाकाळ्या यादीत समावेश केलेला नसेल तर हे काम देण्यात यावे. काळ्या यादीत समावेश असेल

तर क्र.२ च्या एजन्सीला त्याच दरात हे काम देण्यास मान्यता देण्यात येते. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे छपाई साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदांपैकी खालील दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे म्हणजेच १) मे.लिबर्टी प्रिन्टर्स, औरंगाबाद-एकूण ४५ आयटम, २) मे.विशाल इंटरप्रायजेस, औरंगाबाद-एकूण ४० आयटम, ३) मे.श्री गणेश प्रिंटींग प्रेस, औरंगाबाद-एकूण ७७ आयटम, ४) मे.जयभारती एक्स.बुक मॅन्यु.कंपनी,औरंगाबाद-एकूण ०५ आयटम, ५) मे.राका प्रिन्टर्स, नाशिक-एकूण १० आयटम, ६) मे.न्यु रत्नमाला प्रिन्टर्स अँड सप्लायर्स, औरंगाबाद-एकूण ०१ आयटम करीता प्राप्त झालेल्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २० :**

मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे संगणक साहित्य पुरवठा करण्यास्तव मा.आयुक्त यांची मान्यता दि.१६.५.२००५ नुसार दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सकाळ पुणे, दैनिक लोकमत औरंगाबाद या वर्तमानपत्रात जहिरात प्रसिध्दीस देऊन निविदा मागविण्यात आल्या. दि.१९.५.२००५ ते ३१.५.२००५ या कालावधीत एकूण ९(नऊ) निविदा विक्री झाल्या व दि.३.६.२००५ रोजी एकुण ६(सहा) निविदा प्राप्त झाल्या. पैकी सुरभी कॉम्प्युटरची निविदा कागदपत्राअभावी उघडण्यात आली नाही. इतर एकुण ५(पाच) निविदाधारकांनी दिलेल्या दरानुसार सोबत तुलनात्मक दराचा तक्ता जेडल्याप्रमाणे असुन अधोरेखीत केलेले दर हे त्या त्या निविदाधारकांचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर आहेत. त्याचप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षासाठीचे मान्य दराचा उल्लेखसुध्दा तुलनात्मक दराच्या तक्त्यात नमुद करण्यात आलेला आहे.

प्राप्त कमी दर हे अत्यंत स्पर्धात्मक दर आहेत, त्याचप्रमाणे बाजरातील दरापेक्षा सरासरी कमी दर असून एकूण ५० आयटम पैकी ११ आयटम मध्येच थोड्याफार प्रमाणात गत वर्षीच्या मान्य दरापेक्षा जस्त दर असुन त्यामुळे फक्त अंदाजे रू.७०००/- जस्तीचा खर्च अपेक्षित आहे. खालील प्रमाणे निविदाधारकांची नांवे देण्यात येत असून त्यासमोर त्या त्या निविदाधारकांनी भरलेला तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचेएकुण आयटमचा उल्लेख केलेला आहे.

| | |
|---|---|
| १) मे.विजय जनरल स्टोअर्स, औरंगाबाद | एकूण ०९ आयटम |
| २) मे.युनायटेड स्टेशनर्स, औरंगाबाद | एकूण ०५ आयटम |
| ३) मे.आर.एल.दौलताबादकर, औरंगाबाद | एकूण ०३ आयटम |
| ४) मे.न्यु भारत स्टोअर्स,औरंगाबाद | एकूण २६ आयटम |
| ५) मे.ओके ट्रेडर्स, औरंगाबाद | एकूण ०९ आयटम |

उपरोक्त आयटममध्ये एकूण ५२ आयमटममध्ये दोन निविदाधारकांचे फक्त दोन आयटमचे दर समान असुन त्यांना सदर साहित्य विभागून पुरवठा आदेश देण्यात येईल. एकुण अंदाजित खरेदी रू.३.५० लक्ष एवढी आहे. यासाठी लेखन साहित्य खरेदीसाठी एकुण अंदाजे रू.१५.०० लक्ष अंदाजपत्रकीय तरतुद ठेवण्यात येत आहे. सदर निविदेस मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे संगणक साहित्य पुरवठा करण्यास्तव प्राप्त झालेल्या निविदांपैकी खालील दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे म्हणजेच १) मे.विजय जनरल स्टोअर्स, औरंगाबाद-एकूण ०९ आयटम, २) मे.युनायटेड स्टेशनर्स, औरंगाबाद-एकूण ०५ आयटम, ३) मे.आर.एल.दौलताबादकर, औरंगाबाद-एकूण ०३ आयटम,४) मे.न्यु भारत स्टोअर्स,औरंगाबाद-एकूण २६ आयटम, ५) मे.ओके ट्रेडर्स, औरंगाबाद-एकूण ०९ आयटम, करीता प्राप्त झालेल्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या इतर सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे लेखन साहित्य पुरवठा करणेस्तव मा.आयुक्त यांची मान्यता दिनांक १६.५.२००५ अनुसार दैनिक महाराष्ट्र टाईम्स, मुंबई, दैनिक सकाळ,पुणे व दैनिक लोकमत, औरंगाबाद या वर्तमानपत्रात जहिरात प्रसिध्दीस देवून निविदा मागविण्यात आल्या. दि. १९.५.२००५ ते दि.३१.५.२००५ या कालावधीत एकूण १४ निविदांची विक्री झाली. दिनांक ३.६.२००५ रोजी एकूण ८ निविदा प्राप्त झाल्या. पैकी मे.शिवराज ट्रेडर्स, औरंगाबाद यांची निविदा कागदपत्रा अभावी उघडण्यात आली नाही. उर्वरीत एकूण सात निविदाधारकांनी दिलेल्या दराचा तुलनात्मक तक्ता सोबत जेडल्याप्रमाणे असून अधोरेखित केलेले दर हे त्या त्या निविदाधारकांचे तुलनात्मकदृष्ट्या प्राप्त कमी दर आहेत. त्याचप्रमाणे सन २००४-२००५ या वर्षाचे मान्य निविदा दरांचा उल्लेख देखील सदर तुलनात्मक तक्त्यात करण्यात आलेला आहे.

एकूण १०१ आयटम्सचा निविदेत समावेश असून, स्पर्धात्मक दर प्राप्त आहे. निविदेतील एकूण १० आयटम्सचे (आयटम क्र.९, २२, ४०, ६२, ६८, ६९, ७७, ८०, ८८, ९७) दर दोन निविदाधारकांचे तर एका आयटम क्र.६६ मध्ये तीन निविदाधारकांचे दर समान आहेत. त्यामुळे सदर साहित्य संबंधीत निविदाधारकास समान विभागून पुरवठा आदेश देण्यात येतील.

एकूण १०१ आयटम्सपैकी सात आयटम्सवर सुमारे ५.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे. सदर सात आयटम्स पुढील प्रमाणे आहेत, रायटींग पेपर १/२ व १/४, रूलींग पेपर, झेरॉक्स पेपर, ए-४, १/४ व १/२ तसेच डबल साईड कार्बन इ. सदर साहित्याचे दर गतवर्षीपेक्षा जस्त आल्याने व एकूण अंदाजे खरेदी पाहता या साहित्यात दराचे वाटाघाटी करून ५% दर कमी करून अंतिम करण्यात आले आहेत. यास व उर्वरीत प्राप्त दरास मा.आयुक्त यांनी मान्यता प्रदान केली आहे. लेखन साहित्य खरेदीवर अंदाजेरूपये ८.०० लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे.

खालील दर्शविलेप्रमाणे निविदाधारकांची नांवे देण्यात येत असून त्या समोर त्या त्या निविदाधारकांचे तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे एकूण आयटम्सचा उल्लेख केलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. डी.के.स्टेशनर्स ॲण्ड प्रिंटर्स | एकूण ०३ आयटम्स |
| २) | मे. न्यु रत्नमाला प्रिंटर्स अँड सप्लायर्स | एकूण १८ आयटम्स |
| ३) | मे. विजय जनरल स्टोअर्स | एकूण ३८ आयटम्स |
| ४) | मे. न्यु भारत स्टोअर्स | एकूण ११ आयटम्स |
| ५) | मे. आर.एल.दौलताबादकर | एकूण १४ आयटम्स |
| ६) | मे. भारत स्टेशनर्स अँड जनरल स्टोअर्स | एकूण ०२ आयटम्स |
| ७) | मे. ओ. के. ट्रेडर्स | एकूण २७ आयटम्स |

करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका अंतर्गत जकात विभागास, विभागीय कार्यालयास तसेच महानगरपालिकेच्या अंतर्गत येणाऱ्या इतर सर्व विभागास सन २००५-२००६ या वर्षासाठी लागणारे लेखन साहित्य पुरवठा करणेस्तव प्राप्त झालेल्या निविदांपैकी खालील दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्ट्या कमी दराचे म्हणजेच १)मे. डी.के.स्टेशनर्स ॲण्ड प्रिंटर्स-एकूण ०३ आयटम्स,२)मे. न्यु रत्नमाला प्रिंटर्स अँड सप्लायर्स-एकूण १८ आयटम्स, ३)मे. विजय जनरल स्टोअर्स-एकूण ३८ आयटम्स, ४)मे. न्यु भारत स्टोअर्स-एकूण ११ आयटम्स, ५)मे. आर.एल.दौलताबादकर-एकूण १४ आयटम्स, ६)मे. भारत स्टेशनर्स अँड जनरल स्टोअर्स-एकूण ०२ आयटम्स, ७)मे. ओ. के. ट्रेडर्स-एकूण २७ आयटम्स करीता प्राप्त झालेल्या दरास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहराच्या ज्या भागात जलवाहिनी टाकण्यात आलेली नाही. तसेच ज्या भागात जलवाहिनीद्वारे पाण्याचा पुरेसा पुरवठा होत नाही, अशा भागात टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे मोठे सहा व लहान तीन टँकर्स आहेत. याशिवाय उन्हाळ्यात पाणी टंचाईच्या काळात पाणी पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेचे टँकर्स कमी पडत असल्यामुळे भाडेतत्वावर माहे मार्च २००५ पासुन खाजगी वॉटर टँकर लावण्यात आलेले आहेत. यासाठी खाजगी टँकर धारकाकडून निविदा मागवून वाटाघाटीअंती खालील प्रमाणे दर निश्चित करण्यात आले आहेत.

| अ.क्र. | एजन्सीज | क्षमता(लिटर्स) | प्रतिदिन भाडे | प्रति कि.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद | ५००० | ४९०/- | ८.०० |
| | | १०००० | ७५०/- | १०.७५ |
| २ | मे.श्री साईकृपा ट्रान्सपोर्ट, औरंगाबाद | १२००० | ७९०/- | ११.०० |

सुरवातीस सर्वसाधारणपणे तीन ते चार खाजगी टँकर्सची गरज पडेल असे अपेक्षित होते. परंतु टँकरची मागणी सतत वाढत गेल्यामुळे आवश्यकतेप्रमाणे जस्तीचे टँकर लावण्यात आलेले आहेत. सध्या पाणी पुरवठ्याकरीता महानगरपालिकेचे नऊ व खाजगी सात टँकर कार्यरत आहेत. यामध्ये ५००० लिटर क्षमतेचे तीन, १०००० लिटर क्षमतेचे दोन व १२००० लिटर क्षमतेचे दोन असे सात खाजगी टँकरचा समावेश आहे.

औरंगाबाद शहर व परिसरात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे भाडेतत्वावरील टँकर सर्वसाधारणपणे जुलै २००५ पर्यंत चालवावे लागतील व त्यासाठीरक्कम रू.१४.०० लाखाचा खर्च अपेक्षित आहे. मा. आयुक्त यांनी वरील दराप्रमाणे येणाऱ्या अपेक्षित रू.१४.०० लाख खर्चास शिफारस केलेली आहे. तरी वाटाघाटी अंती निश्चित केलेल्या दरास व भाडेतत्वावरील टँकर करीता होणाऱ्या रूपये १४.०० लाखाच्या अपेक्षित खर्चास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.शशांक विसपुते : माझ्या वॉर्डमध्ये टँकरद्वारे जस्तीत जस्त पाणी पुरवठा करण्यात येतो. मार्च पासून खाजगी टँकर चालू करण्यात आले. मध्यंतरी निवडणूकीच्या काळात सदर

टँकर येत नसे. याबाबत अनेक लोकांच्या तक्रारी आल्या. त्यावरून चौकशी केली जेथून टँकरचा पाणी भरणा होतो तेथे चौकशी केली तर टँकर पाठवले असे सांगण्यात येत असे. परंतु तो टँकर त्या भागात येत नसे. अशी १५-२० उदाहरणे देता येतील. टँकरच्या नंबरसह त्या विभागास पत्र देवून माहिती घेतली. दोन्ही एजन्सी भागीदारी असल्यामुळे एकच आहे. ह्या एजन्सीचे टँकर हे खाजगी खेपा करतात. क्र.७६७६ हे टँकर रेणुकानगरमध्ये येत असे परंतु मध्यंतरी ४-५ दिवसात आले नाही. चौकशी केली असता टँकर भरून गेले असे सांगण्यात येत असे. परंतु काही नागरीकांनी विचारणा केली असता टँकरमध्ये प्रॉब्लेमहोता म्हणून आले नाही असे सांगितले जत असे. परंतु एका मजूर व्यक्तीने ते हेडगेवार रूग्णालयात कामाला होते. तेथे बांधकाम चालू असताना सदर टँकरने पाणी पुरवठा झाल्याचे म्हटले आणि तेथे आजही रेग्युलर पाणी पुरवठा होतो आहे. तसेच टँकर क्र.१४३८ गजाननगर येथे श्री.बडे यांचे नावाखाली येते. सदर टँकर १५ दिवसातून तीन वेळेस येतच नाही. ५०% पाणी त्यांनी वाटप केलेले नाही. विजयनगर भागात सुध्दा टँकर येते तेथेही अशाच पध्दतीने गॅप देऊन पाणी दिले जते. विजयनगर भागात श्री.अंभोरे यांचे नावाखाली टँकर येते. महिन्यातून ४ ते ५ दिवस पाणी पुरवठा होत नाही. किती खेपा कोणत्या भागात टाकाव्या ते रेकॉर्डवर आहे. परंतु प्रत्यक्षात नागरीकांना पाणी मिळालेले नाही. रेकॉर्डवर कालच एक टँकर पुंडलिकनगर भागात लोकप्रभा प्रोव्हीजन जवळ गेले असे दाखविले. परंतु तेथे टँकर आलेच नाही. एखादीएजन्सी मनपाचे पाणी घेऊन दुसरीकडे देत असेल तर त्वरीत कार्यवाही करावी. पाणी विकताना दि.२४/१०/२००४ रोजे काही कार्यकर्त्यांनी पकडले होते. आजही ते खाजगी ट्रिपा टाकतात. म्हणून याएजन्सीने फसवणूक केलेली आहे. मनपाचे पाणी विकले आहे. याची चौकशी करूनच निर्णय घेण्यात यावा.

श्री.रविकांत गवळी : खाजगी टँकरधारक हे मनपामध्ये नोंद आहे परंतु पाणी वाटपाच्या नावाखाली खाजगी ठिकाणी पाणी विकतात. याची चौकशी करावी.

सौ. संगिता जधव : ज्या लोकांनी पैसे भरणा केले त्यांना ४-४ दिवस पाणी मिळत नाही. पैसे न भरणाऱ्या लोकांना पाणी मिळते. हनुमान नगर भागातील ही तक्रार आहे.

श्री.गजनन बारवाल : सचिन वॉटर सप्लायर व साईकृपा ट्रान्सपोर्ट यांनी जेदर दिले आहे ते संशयास्पद आहेत. ४९०/- प्रतिदिन भाडे दिले आहे. कोणतेही टँकर ४९०/- रूपयात पाणी देऊ शकत नाही. एका ट्रिपसाठी किमान १० लिटर इंधना प्रमाणे ३३०/- रू.खर्च व वाहन चालक यांचा खर्च वेगळा होणार आहे.

मा. आयुक्त : ४९०/- रूपये एका दिवसाचे होतील. जर १०० कि.मी. ते वाहन चालवले तर ८/- रू.कि.मी. प्रमाणे रक्कम देणार आहे.

श्री.गजनन बारवाल : तरी सुध्दा याची चौकशी करावी. स.सदस्य श्री.विसपुते यांनी जी माहिती दिली त्यासंबंधी दखल घेण्यात यावी.

मा. सभापती : स.सदस्यांच्या माहितीनुसार सचिन वॉटर सप्लायर तसेच श्री साईकृपा ट्रान्सपोर्ट या दोन्ही एजन्सी एकाच मालकाच्या आहेत असे निदर्शनास आणून दिले. त्यामध्ये मनपा कर्मचारी किंवा अधिकारी यांचे मालकीचे वाहन आहेत का, हे सुध्दा तपासून पाहण्याची गरजआहे. ज्यांना पाणी मिळत नाही अशा गोरगरीब जनतेला पाणी पुरवठा केला जतो. आपण त्या नागरीकांकडून पैसे सुध्दा घेतो. यामध्ये

कुणी बेईमानी करीत असेल व पैसे कमविण्याचा उद्देश ठेवत असेल तर मनपाने निश्चित केलेल्या टँकरने पाणी पुरवठा होत असताना कुणी खाजगी ठिकाणी पाणी पुरवठा करीत असेल तर योग्य नाही. किलोमीटर प्रमाणे मनपा पैसे अदा करते म्हणून २४ तास ते मनपाकडे उपलब्ध असावे. यात पारदर्शकता असावी. जेथे जेथे पाणी वाटप होते तेथे टँकरची ट्रिप गेल्यानंतर संबंधीत नगरसेवकांना दिवसभरात किती ट्रिपा झाल्या याचा अहवाल संबंधीत कनिष्ठ अभियंता यांनी दिला पाहिजे. ट्रिपा टाकताना नगरसेवक व तेथील नागरीकांची सही घेण्यात यावी व यासाठी स्वतंत्र रजिष्टरवर नोंदी ठेवाव्या. पाणी चोरी होते याची चौकशी करून पाणी पुरवठ्यात खंड पडणार नाही याची दखल घ्यावी. हा प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे पाणी टंचाईच्या काळात पाणी पुरवठा करण्यासाठी भाडेतत्वावर खाजगी टँकर धारकाकडून निविदा मागवून वाटाघाटीअंती निश्चित करण्यात आलेल्या खालील दर्शविलेल्या दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र. | एजन्सीज | क्षमता(लिटर्स) | प्रतिदिन भाडे | प्रति कि.मी. |
|---|---|---|---|---|
| १ | मे.सचिन वॉटर सप्लायर्स, औरंगाबाद | ५००० | ४९०/- | ८.०० |
| | | १०००० | ७५०/- | १०.७५ |
| २ | मे.श्री साईकृपा ट्रान्सपोर्ट, औरंगाबाद | १२००० | ७९०/- | ११.०० |

तसेच त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रूपये १४.०० लाखाच्या अपेक्षित खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. २३ :</u>**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०४/प्रक्र.१२/सेवा/९ मंत्रालय, मुंबई दिनांक २४.३.२००५ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १-४-२००५ पासून महागाई भत्ता वाढ ३% मंजुर केलेली आहे.

औरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना १-४-२००५ पासून महागाई भत्ता ११% ऐवजी १४% अदा करण्यासाठी प्रतिमहा रू.७.३० लाख खर्च अपेक्षित आहे. सन २००५-०६ च्या अर्थसंकल्पात वेतन व भत्ते अदा करण्यासाठी स्वतंत्र तरतुद करण्यात आलेली आहे. महानगरपालिका कर्मचाऱ्यांना एप्रिल २००५ ते जुन २००५ या तीन (३) महिन्याची थकबाकी रोखीने जुलै २००५ मध्ये अदा करण्याच्या व जुलै २००५ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात ११% ऐवजी १४% महागाई भत्ता समाविष्ट करण्याच्या मान्यतेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>संवाद :</u>**

श्री.रविकांत गवळी : यामुळे दर महिन्याला ७.५० लक्ष खर्च येणार आहे. हा खर्च करू शकतो का?

मा. आयुक्त : कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे जे आर्थिक फायदे आहेत यात बोनस असेल, महागाई भत्ता असेल तो आपण शासनाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही करू. शासनाने दिला तर देऊ, शासनाने ३% वाढ केली म्हणून ३%चा प्रस्ताव सादर केलेला आहे. बोनस देण्याचा विषय असेल तो सर्वसाधारण सभेचा अधिकार आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करता येईल.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाने शासन निर्णय क्रमांक वित्त विभाग मभवा/११०४/प्रक्र.१२/सेवा/९ मंत्रालय, मुंबई दिनांक २४.३.२००५ नुसार राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १-४-२००५ पासून महागाई भत्ता वाढ ३% मंजुर केलेली असल्यानेऔरंगाबाद महानगरपालिकेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना १-४-२००५ पासून महागाई भत्ता ११% ऐवजी १४% अदा करण्यास तसेच एप्रिल २००५ ते जुन २००५ या तीन (३) महिन्याची थकबाकी रोखीने जुलै २००५ मध्ये अदा करण्यास व जुलै २००५ च्या मासिक वेतनापासून नियमित पगारात ११% ऐवजी १४% महागाई भत्ता समाविष्ट करण्यास सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४ :**

महाराष्ट्र शासनाच्या मा.श्री.सुरेश काकाणी, डायरेक्टर, डिझास्टर मॅनेजमेंट युनिट, रिव्हेन्यू अँड फॉरेस्ट डिपार्टमेंट, गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र, मुंबई यांनी रू.८,००,०००/- (रू.आठ लाख फक्त) औरंगाबाद शहरासाठी मंजूर केलेले आहेत. पैकी रू.६,००,०००/-(रू.सहा लाख फक्त) चा डी.डी.अग्निशमन दलास प्राप्त झाला आहे. आपत्कालीन व्यवस्थापन योजना कार्यान्वीत करणे, ज्यामध्ये अग्निशमन दलाची ''सर्च अँड रेस्क्यू टीम'' स्थापन करून कार्यान्वीत करावयाची आहे. ही टीम ३६ लोकांची असून ती भूकंप, चक्री वादळ, महापूर, रोड अपघात, मोठ्या आगी, एल.पी.जी. लिकेज, रस्त्यावरील केमीकल अपघात, आतंकवाद्यांनी/अतिरेक्यांनी घडवून आणलेले स्फोट, दंगली इत्यादी वेळी मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांमध्ये काम करणार आहे. आपत्कालीन व्यवस्थापन फंडामध्ये महाराष्ट्र शासनाने रू.आठ लाख मान्य केलेले आहे व जस्तीचा फंड महानगरपालिकेस जमा करावा लागणार आहे. औरंगाबाद शहरातील पेट्रोल पंप, गॅस एजन्सी, हॉटेल्स, सिनेमा हॉल, मंगल कार्यालय, पेंट शॉप, कारखाने, सॉ मील, केमीकल गोडावून, स्पीरीट साठा, स्क्रॅप गोडावून, रॉकेल एजन्सी, शाळा, कॉलेज इत्यादींची तपासणी करून फायर रिस्क असेसमेंट करावयाची आहे. तसेच सोबतच्या यादीनुसार कामे करावयाची आहेत. सध्या उपरोक्त व्यवसाय धारकांमध्ये थोडे ट्रेड धारक अग्निशमन दलाचे परवानाधारक आहेत.

करीता उपरोक्त प्रस्तावित काम करणे व महाराष्ट्र शासनाच्या आपत्कालीन व्यवस्थापन योजनेसाठीची रक्कम मा.उप आयुक्त व मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या नांवे राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवून प्रस्तावित उपरोक्त कामे करावयाचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

मा. सभापती : संबंधीत अधिकाऱ्यांनी खुलासा करावा.

मुख्य अग्नि.अधिकारी : यानुसार वेगवेगळे कार्यक्रम करायचे असून ८ लक्ष रूपये मिळतील त्यापैकी ६ लक्ष मिळालेले आहेत. नंतर वेगळे फंडस् येणार आहेत. यात भूकंप, चक्रीवादळ, रोड अपघात असतील,मोठ्या स्वरूपाच्या आगी असतील जसे काल-परवा लागलेली आग. अशा दुर्घटना मराठवाड्यात झाल्यास तेथे टिम घेऊन काम करावे लागेल. यात एकूण ३६ कर्मचाऱ्यांची टिम काम करेल. आणि या ठिकाणी ८ जिल्ह्यात काम करण्यासाठी पाठवावे लागेल. त्या जिल्ह्याचे जिल्हाधिकारी किंवा पोलीस अधिक्षक यांचे अंतर्गत काम करावेलागेल. आणि यासाठी जे प्रशिक्षण असेल व इतर कार्यक्रम घ्यावे लागतील. त्यासाठी हा निधी दिलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : ३६ लोकांची टिम यात कोणते लोक राहतील की अग्निशमन दलातीलच कर्मचारी आहेत.

मुख्य अग्नि.अधिकारी : सध्या अग्निशमन दलातीलच कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देणार आहोत. जेव्हा जस्तीचे बजेट उपलबध होईल त्यावेळेस स्वतंत्र टिम करता येईल.

मा. आयुक्त : पूर्ण मराठवाड्यासाठी त्यांनी औरंगाबाद सेंटर ठेवले आहे. सर्वच ठिकाणी एवढे पैसे खर्च करू शकत नाही. यासाठी शासनाकडून पैसे येतील, थोड्याफार प्रमाणात मनपास पैसे खर्च करावे लागतील. जे पैसे येणार हे स्वतंत्र फंडस् मध्ये टाकता येतील. माझ्या माहितीप्रमाणे प्रत्येक वर्षी १.५० कोटी रूपये आहे. ५ वर्षासाठी शासनाकडे मागणी केलेली आहे. दरवर्षी कमीत कमी ५० लक्ष येण्याची शक्यता आहे. यामुळे एक अद्ययावत सेंटर तयार होईल.

सौ. लता दलाल : आहे त्याच कर्मचाऱ्यांमधून टिम तयार केल्यास सदर टिम मराठवाड्यासाठी कार्यरत केल्यास त्या काळात स्थानिक पातळीवर काही दुर्घटना घडल्यास त्यावेळी कोणते कर्मचारी काम करतील. टिम तयार केल्यानंतर नवीन कर्मचारी आवश्यकतेनुसार भरती करणार आहोत का?

मा. सभापती : आपत्कालीन घटना जेव्हा घडतात तेव्हा मराठवाडाच नव्हे तर इतर ठिकाणी मनपाची टिम पाठविण्यात आलेली आहे. आपत्कालीन सेवेत या विभागाचे काम चांगले आहे.

श्री.दिलीप गायकवाड : शहराच्या बाहेर जेव्हा टिम जते तेव्हा काही चार्जआकारला जतो का?

मुख्य अग्नि.अधिकारी : शहरात नाही परंतु शहराबाहेर सदर टिम काम करते त्या ठिकाणच्या मालकाकडे लायसन्स नसेल जे मनपास त्यापासून कर मिळतो. त्याचेकडून पूर्ण चार्ज आकारून वसूली केली जते.

श्री.दिलीप गायकवाड : गेल्या १० वर्षात मनपास किती उत्पन्न मिळाले याची माहिती द्यावी.

मुख्य अग्नि.अधिकारी : १ एप्रिल २००३ ते ३१ मार्च २००४ पर्यंत १८.७७ लक्ष वसूल करण्यात आलेले आहेत. १ एप्रिल २००४ ते ३१ मार्च २००५ पर्यंत २५.१२ लक्ष वसूल केलेले आहेत. १ एप्रिल २००५ ते ३० जून २००५ पर्यंत ७.४१ लक्ष जमा केले. ही वसूली जे कॉल येतात त्याची आहे. लायसन्स देण्याची कार्यवाही चालू आहे. पोलीस विभाग व आरोग्य विभाग यांनी एकत्रित येऊन हे काम करायचे आहे. पोलीस विभागाकडून २००० साली अंमलबजवणी कडक झाली होती तेव्हा ४०-५० लक्ष वसलू झालेले होते.

मा. सभापती : प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आपत्कालीन व्यवस्थापन योजना कार्यान्वीत करणेसाठी अग्निशमन दलाची ''सर्च अँड रेस्क्यू टीम'' स्थापन करून कार्यान्वीत करण्यास व भूकंप, चक्री वादळ, महापूर, रोड अपघात, मोठ्या आगी, एल.पी.जी. लिकेज, रस्त्यावरील केमीकल अपघात, आतंकवाद्यांनी/अतिरेक्यांनी घडवून आणलेले स्फोट, दंगली इत्यादी वेळी मराठवाड्याच्या आठ जिल्ह्यांमध्ये काम करण्यासाठी आपत्कालीन व्यवस्थापन फंडामध्ये शासनाकडून प्राप्त झालेली आपत्कालीन व्यवस्थापन योजनेसाठीची रक्कम मा.उप आयुक्त व मुख्य अग्निशमन अधिकारी यांच्या नांवे राष्ट्रीयीकृत बँकेत ठेवून प्रस्तावित उपरोक्त कामे करण्यास तसेच या कामासाठी लागणारा जस्तीचा फंड उभारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, संत एकनाथ रंगमंदीर येथील वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यासाठी निविदा सूचना ज.क्र.मनपा/मामअ/६०८/०५ दिनांक १८.५.२००५ रोजे दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजित तारखेपर्यंत एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या होत्या. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या असून त्या खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. देवेंद्र दौलत मोरे रू.१०,०००/- प्रती माह

२. श्री.खान जहागीरदार सौदागर एजन्सी रू.२२५१/- प्रती माह

सदर कामासाठी कार्यालयाने रू.९९२८/- प्रती माह अशी आधारभुत किंमत ठरविली होती. परंतु प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये श्री.देवेंद्र दौलत मोरे यांनी आधारभुत रक्कमेपेक्षा जस्त रू.१०,०००/-प्रती माह असा दर दिल्याने जस्तीच्या दराच्या निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**मा. सभापती** : प्रस्ताव क्र.**२५, २६** मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे संत एकनाथ रंगमंदीर येथील वाहनतळ फी वसुलीचा ठेका देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी आधारभुत रक्कमेपेक्षा जस्त म्हणजेच प्रतिमाह रू.१०,०००/- ची श्री. देवेंद्र दौलत मोरे यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६ :**

उप आयुक्त (महसूल) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फी वसुलीसाठी कार्यालयीन निविदा सुचना ज.क्र.मनपा/मामअ/६०८/२००५ दि.१८.५.२००५ रोजी वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या.

कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस एकूण १० कोऱ्या निविदा विक्री झाल्या होत्या. तसेच सिलबंद निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ५ निविदा प्राप्त असुन त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. मो. नईम रू.३९,७००/- प्रती माह

२. श्री. देवेंद्र मोरे रू.३५,५५५/- प्रती माह

३. श्री.अमोल ज्ञान अभंग रू.३१,६१६/- प्रती माह

४. श्री.महेंद्र अमरसिंह परदेशी रू.३०,५००/- प्रती माह

५. श्री.सय्यद फय्याजहुसेन रू.३०,०००/- प्रती माह

सदर कामासाठी आधारभुत किंमत रू.२७,६१६/- प्रती माह अशी कार्यालयाने ठरविली आहे. प्रत्यक्षात प्राप्त निविदामध्ये सर्वात जस्त दर हा श्री.मो. नईम यांचा असून तो रू.३९,७००/- प्रति माह असा दर दिलेला आहे. करीता श्री.मो. नईम यांनी रू.३९,७००/- प्रती माह दिलेल्या दरास मान्यतेस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान वाहनतळ फी वसुलीसाठीचा ठेका देण्यासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी आधारभुत रक्कमेपेक्षा जस्त म्हणजेच प्रतिमाह रू.३९,७००/- ची श्री. मो. नईम यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, महानगरपालिकेकडील खालील दर्शविलेली वाहने ही खुपच जुनी झाली आहेत. नियमितपणे दुरूस्ती करून ती कार्यरत आहेत. वाहने जस्त जुनी झाल्यामुळे त्यांची कार्यक्षमता कमी होते व दुरूस्ती खर्चसुध्दा वाढतो. अशी वाहने लिलावात काढून त्या जगी नवीन वाहने खरेदी करावी लागतील.

| अ. क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | वापरणारे अधिकारी/विभाग | माडेल वर्ष | एकूण कार्यरत वर्ष | कि. मी. रन | नवीन वाहन खरेदीसाठी लागणारी अंदाजे तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | एमटीबी-४३४८ | टू व्हीलर ट्रॉली | उद्यान विभाग | १९८१ | २३ | -- | १.०० |
| २ | एमडब्ल्युपी ४०६ | टू व्हीलर ट्रॉली | उद्यान विभाग | १९८१ | २३ | -- | १.०० |
| ३ | एमएक्सव्ही ५२६७ | महिंद्रा ट्रॅक्टर | पशुवैद्यकीय अधि. | १९८२ | २२ | -- | ४.०० |
| ४ | एमडब्ल्युपी ५८५ | ट्रॉली | उद्यान विभाग | १९८३ | २१ | -- | १.०० |
| ५ | एमडब्ल्युपी १४७८ | ट्रक | विभाग क्र.६ | १९८३ | २१ | ३७८००० | २९.०० नवीन कॉम्पॅक्टर/ कंटेनर घेणे |
| ६ | एमडब्ल्युपी १७५९ | टँकर ट्रॉली | उद्यान विभाग | १९८४ | २० | -- | १.०० |
| ७ | एमएए ३०८ | महिंद्रा जेप | विभाग क्र.२ | १९८५ | १९ | २८५००० | ५.०० |
| ८ | एमएक्सव्ही ५७८४ | महिंद्रा ट्रॅक्टर | उद्यान विभाग | १९८६ | १८ | -- | ४.०० |
| ९ | एमएक्सव्ही ५४८८ | महिंद्रा ट्रॅक्टर | उद्यान विभाग | १९८६ | १८ | -- | ४.०० |
| १० | एमएक्सव्ही ८२११ | महिंद्रा जेप | विभाग क्र.५ | १९८८ | १६ | २८८००० | ५.०० |
| ११ | एमएफयु ९९३० | महिंद्रा जेप | उद्यान विभाग | १९८८ | १६ | २८८००० | ५.०० |
| १२ | एमव्हीजे ९३५३ | महिंद्रा जेप | विभाग क्र.१ | १९८९ | १५ | ३१२००० | ५.०० |
| १३ | एमएच२० ए-२१३८ | टाटा १२१० हायड्रॉ.लॅडर | विद्युत विभाग | १९८९ | १५ | ३१२००० | २०.०० |
| १४ | एमएच२० ई-८०७८ | महिंद्रा जेप | पाणी पुरवठा-१ | १९९२ | १२ | २८८००० | ५.०० |
| १५ | एमएच२० ई-९१५८ | महिंद्रा जेप | विभाग क्र.६ | १९९४ | १० | ४८६००० | ५.०० |
| १६ | एमएच२० ई-३१०० | ॲम्बेसिडर कार | स्पेअर | १९९५ | ९ | २१६००० | जरूर नाही. |
| १७ | एमएच२० ई-३२०० | ॲम्बेसिडर कार | स्पेअर | १९९५ | ९ | २२८००० | जरूर नाही. |
| १८ | एमएच२० १९११ | ॲम्बेसिडर कार | पशुवैद्यकीय अधि. | १९९५ | ९ | २३७३४० | ५.०० डिझेल जेप घेणे |
| | | | | | | एकूण .. | **१००.०० लाख** |

वरील सर्व वाहनांची स्थिती खराब असून ती रिपेअर करून वापरणे यापुढे परवडणारे नाही. वाहने कोणाच्या वापरात आहेत हे वर दर्शविलेले आहे. ही वाहने ऑक्शन करण्यास मंजूरी मिळावी तसेच ही वाहने ऑक्शन केल्यानंतर ज्या त्या विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून नवीन वाहने खरेदीसाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात रू.१०० लाखाची तरतुद घसारा निधी या शिर्षकाखाली करण्यास मंजूरी मिळावी.

यांत्रिकी विभागात खालील तारखेपर्यंत जुने व निरूपयोगी साहित्य खालील प्रमाणे जमा झाले असून त्याचे पण ऑक्शन केल्यास महापालिका फंडात बरीच मोठी रक्कम जमा होईल.

१. जुने निरूपयोगी टायर्स २४.६.२००५ पर्यंत ६९६ नग
२. जुने जळालेले ऑईल २४.६.२००५ पर्यंत ५३ नग
३. जुने भंगार सामान १७.६.२००५ पर्यंत १२.४९ टन

शिवाय यांत्रिकी विभागाकडे एकूण १७६ ऑईलचे रिकामे बॅरल जमा झालेले असून त्याचे पण ऑक्शन करण्यास मंजुरी मिळावी.

या सर्व वाहनांची व सामानांची पाहणी करून त्याची लिलावात किती किंमत येईल हे ठरविण्याकरीता खालील अधिकाऱ्यांची समिती गठीत करण्यात येईल.

१. शहर भियंता, महानगरपालिका औरंगाबाद
२. अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद
३. उप आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद
४. मुख्य लेखाधिकारी, महानगरपालिका औरंगाबाद
५. उप अभियंता (यांत्रिकी), महानगरपालिका औरंगाबाद
६. आर. टी. ओ. औरंगाबाद
७. मेकॅनिकल इंजिनिअर, एस.टी. वर्कशॉप, औरंगाबाद

समितीचा अहवाल बंद लिफाफ्यात गोपनीय राहील व तो शहर अभियंता यांचे कस्टडीत ठेवण्यात येवून ऑक्शनच्या दिवशीच तुलनात्मक दर पाहण्यासाठी तो उघडण्यात येईल. करीता वरील प्रमाणे जुनी वाहने व जुनी यंत्रसामुग्री व साहित्याचा जहीर लिलाव बोली पध्दतीने करण्याचे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

श्री.दिलीप गायकवाड : एक एक गाडी विक्री करणार की संपूर्ण गाड्यांचा लिलाव करणार आहे.

अति.शहर अभियंता : या वाहनांचे आयुष्य संपलेले आहे. ऑक्शन करण्याची मंजुरी घेत आहोत. ऑक्शन करताना टप्प्या टप्प्याने करावे लागेल. एकाच वेळेस सर्व वाहने विकली जणार नाही. कारण पहिल्यांदा त्या अधिकाऱ्यांना घसारा निधीतून वाहने विकत घ्यावी लागतील नंतर ऑक्शन करावे लागेल.

मा. सभापती : कमीत कमी वाहने सांभाळण्याची जबाबदारी राहिल यासाठी प्रशासनाने काळजी घ्यावी. प्रस्ताव मंजूर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिकेकडील जुनी झालेली वाहने, जुनी यंत्रसामुग्री व साहित्याचा जहीर लिलाव बोली पध्दतीने करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच जुन्या वाहनांचा लिलाव केल्यानंतर ज्या त्या विभागाची गैरसोय होऊ नये म्हणून नवीन वाहने खरेदीसाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात रू.१०० लाखाची तरतुद घसारा निधी या शिर्षकाखाली करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८ :**

मुख्य लेखाधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना दरवर्षी प्रमाणे याही वर्षी प्रत्येकी दोन गणवेश देण्याकरीता दैनिक महाराष्ट्र टाईम्स,मुंबई, दैनिक सकाळ,पुणे व दैनिक लोकमत,औरंगाबाद या वर्तमानपत्रात निविदा सूचना प्रसिध्दीस देण्यात आली. दिनांक १९.५.२००५ ते दि.४.६.२००५ या कालावधीत निविदा विक्री करण्यात आली व दि.८.६.२००५ रोजी निविदा स्विकारण्यात आल्या. एकूण १० निविदा दरपत्रकांची विक्री झाली व या कार्यालयास एकूण ९ निविदा प्राप्त झाल्या. दिनांक ८.६.२००५ रोजी

निविदाधारकांनी सादर केलेल्या कागदपत्रांचे पाकीट उघडण्यात आले. ९ निविदाधारक खालील प्रमाणे :

१. मे. इंडेजप्रा. लि. मुंबई
२. मे. चानी इंडस्ट्रीज, वाळूज
३. मे. अंकित कॉटेजइंडस्ट्रीज, औरंगाबाद
४. मे. डी.एम. राठोड, मुंबई
५. मे. मफतलाल फॅब्रीक्स प्रा.लि. मुंबई
६. मे.एम.एस.एस.आय.डी.सी. लि., औरंगाबाद
७. मे.सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित, मुंबई
८. मे. श्रध्दा महिला विकास मंडळ, औरंगाबाद
९. मे. शुभम इंडस्ट्रीज, पैठण.

एकूण ९ निविदाधारकांपैकी खालील ५ निविदाधारकांचे कागदपत्रे निविदा अटी व शर्तीनुसार योग्य असल्याने संबंधीतांनी दिलेले कापडाचे नमुन्यावर उप आयुक्त (प्र), मुख्य लेखाधिकारी व शिक्षणाधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या घेवून व सॅंपल सिल करून दिनांक २०.६.२००५ रोजी शासनमान्य मे.डायरेक्टर ऑफ इन्स्पेक्शन, डी.जी.एस.डी., मुंबई या प्रयोगशाळेत पाठविण्यात आले. परंतु संबंधित संस्थेने गत महिन्यापासून कापड तपासणी बंद केल्याने सदर सॅंपल दुसऱ्या शासनमान्य प्रयोगशाळा मे.विरमाता जिजबाई टेक्नॉलॉजिकल इन्स्टीट्यूट, मुंबई या प्रयोगशाळेत देण्यात आले.

१) मे. इंडेजप्रा. लि. मुंबई
२) मे. चानी इंडस्ट्रीज, वाळूज
३) मे. अंकित कॉटेजइंडस्ट्रिज, औरंगाबाद
४) मे.एम.एस.एस.आय.डी.सी.लि., औरंगाबाद
५) मे. शुभम इंडस्ट्रिज, पैठण

दिनांक २.७.२००५ रोजी सदर संस्थेकडून सिल केलेला तपासणी अहवाल प्राप्त झाला. तपासणी अहवालानुसार खालील दोन एजन्सीचे सॅंपल निविदा विवरणानुसार नसल्याचे आढळून आले.

१) मे. चानी इंडस्ट्रीज, वाळूज
२) मे. अंकित कॉटेजइंडस्ट्रिज, औरंगाबाद

उपरोक्त दोन एजन्सीजचे नमुने नाकारण्यात आल्यानंतर उर्वरित तीन एजन्सीचे दराचे पाकीट दिनांक ५.७.२००५ रोजी उघडण्यात आले. दराचा तुलनात्मक तक्ता बनविण्यात आला असता खालील एजन्सीचे दर त्या समोर दर्शविण्यात आलेल्या साहित्यात तुलनात्मकदृष्ट्या कमी असल्याचे आढळून आले. तुलनात्मक दराचा तक्ता सोबत जेडलेला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | मे. इंडेजप्रा. लि., मुंबई | खाकी रंगाची हाफ पॅन्ट व फुल पॅन्ट |
| २ | मे. एम.एस.एस.आय.डी.सी.लि. | निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज, निळा सलवार व पांढरा पंजे शर्ट, पिनो फ्रॉक |
| ३ | मे. शुभम इंडस्ट्रीज | मुलांचा पांढरा हाफ शर्ट |

गतवर्षीपेक्षा गणवेशात खालील प्रमाणे बदल केलेले आहेत.

१) शिक्षण विभागाचे अहवालानुसार गणवेशाचे मापात प्रत्येकी ३ से.मी.सरासरी वाढ करण्यात आली आहे.
२) शर्टला दोन बटणे अतिरिक्त मागविण्यात आली आहेत.
३) बटणावर एएमसी अशी स्क्रीन प्रिंट करून मागविली आहे.
४) शर्ट व ब्लाऊजच्या डाव्या बाजूस मनपाचे बोधचिन्ह प्रिन्ट करून मागितले आहे.

५) दोन गणवेश एका कॅरी बॅगमध्ये पॅकींगचे स्वरूपात मागितले आहे.
६) पँट व स्कर्टला ६ इंच लांबीचे इलॅस्टीक लावून मागितले आहे.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त दरास मा.आयुक्त यांनी दिनांक १३.७.२००५ ला मान्यतेस्तव शिफारस केली आहे. सदर दरानुसार व शिक्षण विभागाचे पत्र क्र.७०५ दिनांक ७.७.२००५ अनुसार दिनांक ३०.६.२००५ ची स्थिती असलेली विद्यार्थी संख्या या विभागास कळविली आहे. सदर संख्येनुसार व प्राप्त दरानुसार खालील प्रमाणे खर्च येणार आहे. शिक्षण विभागाचेपत्रानुसार १५.७.२००५ पर्यंत प्रवेश पंधरवाडा मनपाच्या सर्व शाळेत साजरा करण्यात येत आहे, त्यामुळे सदर संख्येत वाढ होण्याची शक्यता आहे. तसेच प्रकल्प विभागा अंतर्गत येणाऱ्या बालवाडीच्या विद्यार्थ्यांची संख्या अप्राप्त असल्याने, वाढीव विद्यार्थ्यांची संख्या दिनांक २०.७.२००५ पर्यंत मिळणार असल्याचे कळविले आहे, त्यामुळे खाली दर्शविलेल्या खर्चात वाढ होण्याची शक्यता आहे.

| अ.क्र. | तपशील | विद्यार्थी संख्या | प्राप्त दर | एकूण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | **मुलांसाठी खाकी रंगाची हाफ पॅन्ट** | | | |
| | अ) बालवाडी | १७५७ | २६.०० | ४५,६८२-०० |
| | ब) इयत्ता पहिली | १७२८ | २७.०० | ४६,६५६-०० |
| | क) इयत्ता दुसरी | १६९५ | २७.०० | ४५,७६५-०० |
| | ड) इयत्ता तिसरी | १४५५ | ३१.०० | ४५,१०५-०० |
| | इ) इयत्ता चौथी | १३०१ | ३३.०० | ४२,९३३-०० |
| | ई) इयत्ता पाचवी | १२७० | ३५.०० | ४४,४५०-०० |
| | **मुलांसाठी खाकी रंगाची फुल पॅन्ट** | | | |
| | अ) इयत्ता सहावी | ११०४ | ८१.०० | ८९,४२४-०० |
| | ब) इयत्ता सातवी | १०२१ | ८७.०० | ८८,८२७-०० |
| २ | **मुलांसाठी पांढरा हाफ शर्ट** | | | |
| | अ) बालवाडी | १७५७ | ३१.०० | ५५,४६७-०० |
| | ब) इयत्ता पहिली | १७२८ | ३४.०० | ५८,७५२-०० |
| | क) इयत्ता दुसरी | १६९५ | ३७.०० | ६२,७१५-०० |
| | ड) इयत्ता तिसरी | १४५५ | ४०.०० | ५८,२००-०० |
| | इ) इयत्ता चौथी | १३०१ | ४३.०० | ५५,९४३-०० |
| | ई) इयत्ता पाचवी | १२७० | ४६.०० | ५८,४२०-०० |
| | फ) इयत्ता सहावी | ११०४ | ५१.०० | ५६,३०४-०० |
| | ग) इयत्ता सातवी | १०२१ | ५५.०० | ५६,१५५-०० |
| ३ | **मुलींसाठी निळा स्कर्ट** | | | |
| | अ) इयत्ता पहिली | १५९५ | ४९.२० | ७८,४७४-०० |
| | ब) इयत्ता दुसरी | १७२४ | ५३.०० | ९१,३७२-०० |
| | क) इयत्ता तिसरी | १४६० | ५९.६५ | ८७,०८९-०० |
| ४ | **मुलींसाठी पांढरा ब्लाऊज** | | | |
| | अ) इयत्ता पहिली | १५९५ | २६.९० | ४२,९०६-०० |
| | ब) इयत्ता दुसरी | १७२४ | २८.८० | ४९,६५१-०० |
| | क) इयत्ता तिसरी | १४६० | ३१.१० | ४५,४०६-०० |
| ५ | **मुलींसाठी निळा सलवार** | | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | अ) इयत्ता चौथी | १३८९ | ९३.८५ | १,३०,३५८-०० |
| | ब) इयत्ता पाचवी | १२५३ | ९८.५८ | १,२३,५२१-०० |
| | क) इयत्ता सहावी | ११४७ | १०७.२० | १,२२,९५८-०० |
| | ड) इयत्ता सातवी | १०३५ | १२२.२५ | १,२६,५२९-०० |
| ६ | **मुलींसाठी पांढरा पंजबी शर्ट** | | | |
| | अ) इयत्ता चौथी | १३८९ | ८१.६५ | १,१३,४१२-०० |
| | ब) इयत्ता पाचवी | १२५३ | ९०.०० | १,१२,७७०-०० |
| | क) इयत्ता सहावी | ११४७ | ९४.२० | १,०८,०४७-०० |
| | ड) इयत्ता सातवी | १०३५ | ९८.४० | १,०१,८४४-०० |
| ७ | **बालवाडीच्या मुलींसाठी पिनो फ्रॉक** | १६३२ | ७५.०० | १,२२,४००-०० |
| | | एकूण रूपये.. | | **२३,६६,५३५-००** |

उपरोक्त प्रमाणे एका गणवेशासाठी रूपये २३,६६,५३५-०० खर्च येत आहे. दोन गणवेश देणे आहे त्यासाठी एकूण खर्च रूपये ४७,३३,०७०-०० येणार आहे. सदर खरेदीसाठी अंदाजपत्रकीय तरतुद रूपये ५०.०० लक्ष एवढी ठेवण्यात आली आहे. प्राप्त तिन्ही एजन्सीमार्फत गणवेश खरेदीस मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : दोन गणवेश देण्याऐवजी एक देऊ शकत नाही का. तसेच ज्यांच्या निविदा आलेल्या त्यांनी ठरविलेल्या ठिकाणीच सँपल तपासणीसाठी पाठवणार आहात का ते अधिकार मनपास असावे.

श्री.रेणुकादास वैद्य : शाळा सुरू होतात तेव्हा गणवेश देण्याची काळजी प्रशासनाने घ्यावी. तसेच जी एजन्सी वेळेवर गणवेश देणार नाही त्यांचेवर दंडात्मक कार्यवाही करावी.

मा. सभापती : दोन गणवेश देण्याचा ठराव सर्वसाधारण सभेनेच मंजूर केलेला आहे. त्यानुसार अंमलबजवणी चालू आहे. प्रस्ताव मंजूर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेअंतर्गत येणाऱ्या महानगरपालिकेच्या शालेय विद्यार्थ्यांना सन २००५-२००६ या आर्थिक वर्षात प्रत्येकी दोन गणवेश पुरवठा करणेसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी मान्य कापडाच्या नमुन्या अनुसार (निविदा विवरणानुसार) प्राप्त असलेल्या निविदानुसार कमी दराचे निविदाधारक (१)खाकी रंगाची हाफ पँन्ट व फुल पॅन्ट पुरवठा आदेश मे. इंडेज प्रा. लि., मुंबई यांना, (२)निळा स्कर्ट व पांढरा ब्लाऊज, निळा सलवार व पांढरा पंजबी शर्ट, पिनो फ्रॉक पुरवठा आदेश मे. एम.एस.एस.आय.डी.सी.लि.औरंगाबाद यांना तर (३)मुलांचा पांढरा हाफ शर्ट पुरवठ्याचे आदेश मे. शुभम इंडस्ट्रीज,पैठण यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. तसेच या कामाकरीता लागणाऱ्या एकूण रक्कम रू.४७,३३,०७०-०० च्या खर्चास, निश्चित विद्यार्थी संख्या प्राप्त झाल्यानंतर येणाऱ्या वाढीव खर्चासह सर्वानुमते स्विकृतीसह मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

राष्ट्रगितानंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद